cmyk

## संपादकीय

### सरकारी काम; सहा महिन्यात थांब, असे होऊ नये !

राज्याच्या काही जिल्ह्यात मध्यम स्वरुपाच्या पावसाचा (यलो अलर्ट) हवामान विभागाचा इशारा माध्यमांत प्रसिद्ध झाला आहे. राज्याच्या विविध भागात काही ठिकाणी उघडीप असू शकेल तर काही ठिकाणी हलक्या सरी कोसळतील, असे हवामान विभागाने जाहीर केले आहे. पावसाच्या कमी होणाऱ्या प्रमाणाबरोबरच शेतकऱ्यांच्या बांधावरच्या भेटी संपल्या आहेत. नेत्यांचे दौरे कमी झाले आहेत.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### पाकमध्ये बॉम्बस्फोटात १० पोलिस अधिकारी ठार

पेशावर : पाकिस्तानच्या पेशावरमध्ये मोठा बॉम्बस्फोट झाला असून या घटनेत आतापर्यंत १० जणांचा मृत्यू आणि ४ जण जखमी झाल्याची पुष्टी करण्यात आली आहे. जखमी झालेले लोक सरकारी अधिकारी असल्याचे सांगितले जात आहे. डॉनच्या अहवालानुसार, पाकिस्तानमध्ये हा स्फोट राजधानी शहरात झाला होता जेणेकरून सुरक्षा दलांना लक्ष्य करण्यात येईल. पोलिस अधिकारी मियां सईद यांनी याची पुष्टी केली आहे. मियां सईद यांच्या मते, या घटनेमुळे पोलिस आणि सुरक्षा दलांच्या अधिका-यांना लक्ष्य करण्याचा हेतू होता. प्राथमिक तपासातून असे समोर आले आहे की हा स्फोट पोलिस व्हॅनच्या मार्गात लावलेल्या उपकरणामुळे झाला. त्यांनी सांगितले की जखमींची प्रकृती गंभीर आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१५८ | शनिवार, दि.०४ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना २,२१५ कोटींचे पॅकेज


जालना । प्रतिनिधी

**मराठवाड्यात यंदा झालेल्या मुसळधार पावसाने खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सोयाबीन, कापूस, मूग, उडीद यांसारखी प्रमुख पिके पाण्याखाली गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. अनेक गावांमध्ये शेतजमीन खरडून गेली असून, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या संकटकाळात शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने तत्परतेने पावले उचलली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन मराठवाड्यासाठी विशेष आर्थिक पॅकेजची मागणी केली. याला सकारात्मक प्रतिसाद देत पंतप्रधानांनी केंद्र सरकारकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.**

राज्य सरकारनेही त्वरित कार्यवाही करत २,२१५ कोटींचे मदत पॅकेज जाहीर केले आहे. या पॅकेजअंतर्गत मराठवाड्यासह राज्यातील सुमारे ३१.५ लाख शेतकऱ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात आर्थिक मदत जमा होणार आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा यासाठी नुकसान मूल्यांकन जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश महसूल खात्याला देण्यात आले आहेत. यासाठी ड्रोन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे, ज्यामुळे पंचनामे जलद आणि अचूक होण्यास मदत होईल. तसेच, शेतकऱ्यांना पुढील हंगामासाठी बियाणे, खते आणि अन्य साहित्य उपलब्ध करून देण्याचाही सरकारचा मानस आहे.

परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. ''मराठवाड्यातील शेतकरी अतिवृष्टीमुळे संकटात सापडले आहेत. अशा वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ पुढाकार घेत शेतकऱ्यांना आधार दिला. या मदतीमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल आणि शेती पुनर्बांधणीच्या कामाला

पान २ वर



> **केंद्र आणि राज्य सरकारने मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी**
>
> अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी तातडीने पावले उचलली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष पॅकेजचे आश्वासन दिले आहे, तर राज्य सरकारने ₹२,२१५ कोटींच्या मदत पॅकेजद्वारे ३१.५ लाख शेतकऱ्यांना थेट बँक खात्यात मदत जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. नुकसान मूल्यांकनासाठी ड्रोनसह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे, ज्यामुळे प्रक्रिया जलद होईल. आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांच्या वतीने केंद्र आणि राज्य सरकारचे आभार मानले असून, या मदतीमुळे शेतकऱ्यांना संकटातून थोडाफार बाहेर काढण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# दोन घास कमी खा-पण स्वाभिमानाने रहा जातीपातीच्या राक्षसाचा नाश करा-पंकजा मुंडे

### भगवानभक्ती गडावर अलोट गर्दीचे दर्शन; धनंजय मुंडेंची प्रमुख उपस्थिती

पाटोदा । प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवानबाबांनी 'एकर विका, पण शिक्षण शिका' अशी शिकवण आपल्याला दिली आहे. आज परिस्थिती वेगळी आहे. त्याच शिकवणीप्रमाणे माझे म्हणणे आहे की, 'दोन घास कमी खा –पण स्वाभिमानाने रहा. कोणाचे तुकडे उचलू नका. कोणाचे पैसे घेऊ नका. खोटी कामं–खोटे धंदे करू नका.चांगल्या माणसाचं चांगलंच होतं. भगवान बाबांचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी आहेत.मला तुमचा अभिमान आहे आजच्या कलियुगात जातीपातीचा राक्षस जन्माला आलाय, त्याचा नाश करण्याची गरज आहे सध्या अतिवृष्टी पूरस्थिती आहे पण सरकार शेतकऱ्याच्या पाठीशी आहे शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही सरकार मदत करणार माफी काहीतरी मदत करायला हवी असे आवाहनही पंकजा मुंडे यांनी यावेळी केले.



**माणुसकीचा धागा कायम**

आज मराठवाड्यावर नैसर्गिक संकट आले तरी दसरा मेळाव्याची परंपरा आपण जपली आहे. मराठवाड्यातील लोकांचे संसार वाहून गेले आहेत. लोकांचे दुःख पाहून मी हेलावून गेले. मी माझ्या वेदना शब्दांत मांडू शकत नाही. नैसर्गिक आपत्तीतही एक इष्टापत्ती बघायला मिळाली. जाती–पातीचे बंध गळून पडले आहेत. महापुराच्या काळात माणुसकीचा धागा कायम असल्याचे सकारात्मक चित्र दिसले.महापुराच्या काळात जातीपातीपलिकडे जाऊन प्रत्येक जण एकमेकांसाठी धावून गेला.जातीपातीच्या पलिकडे जाऊन माणुसकीचा धागा जोडण्याचं असं काम आपण केल पाहिजे असं पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

या दसरा मेळाव्याच्या व्यासपीठावर माजीमंत्री आ धनंजय मुंडे ,महादेव जानकर डॉ प्रीतम मुंडे अर्यमान मुंडे प्रा लक्ष्मण

पान २ वर

# मराठ्यांनी आता शासक आणि प्रशासक बनावे मी फक्त काही दिवसाचा पाहुणा-मनोज जरांगे

### नारायण गडावरील दसरा मेळाव्याला अलोट गर्दी ;व्यासपीठावर फक्त महाराज आणि जरांगे पाटील

बीड । प्रतिनिधी

'मी थोड्या दिवसांचा पाहुणा आहे, आणि आपण मुंबईला जायची हाक दिली. कारण मी एक गोष्ट तुम्हाला सांगितली होती. शेवटी शरीर आहे, काही सांगता येत नाही. माझ्या गरिबाच्या लेकराच्या आयुष्याचं कल्याण करु द्या, मुंबईला चला. कारण, मी त्याचवेळी एक गोष्ट सांगितली होती. मी आहे तोपर्यंत, माझ्या समाजाच्या लेकराला आरक्षण दिलेलं मला बघायचं आहे.तुम्ही आत्ताच साथ दिली तर मी माझ्या समाजाच्या लेकरांच्या आयुष्याचं कल्याण करु शकतो'.आता समाजाने शासक आणि प्रशासक बनले पाहिजे असे आवाहन दसरा सणाच्या मुहूर्तावर नारायण गडावरील दसरा मेळाव्यात मनोज जरांगे पाटील यांनी केले.



व्यासपीठ हे मधोमध उभारण्यात आले होते व्यासपीठावर केवळ ३ खुर्च्या होत्या त्यावर शिवाजी महाराज जरांगे पाटील आणि मेंगडे महाराज होते व्यासपीठावरून बोलताना जरांगे पाटील म्हणाले कि 'तुम्ही मुंबईला साथ दिली आणि ७५ वर्षात मराठ्यांनी जीआर घेऊन लढाई जिंकली. मी आता थोड्या दिवसाचा पाहुणा असो की लई दिवसाचा, मला त्याची चिंता नाही. कारण जीवनात येऊन जे सिद्द करायचं होतं ते मी सिद्ध केलं आहे. गरीब मराठा समाज खूप होरपळत

पान २ वर

## थोडक्यात...

### नागपुरात काँग्रेसची विचारमंथन कार्यशाळा

नागपूर : विजयादशमीच्या निमित्ताने गुरूवारी मुंबईत शिवसेनेच्या दोन्ही गटांचे वेगवेगळे मेळावे झाले. भाजपा, मनसे, राष्ट्रवादीचे दोन गट यांचेही कार्यकर्ते मेळावे आणि पदाधिकारी बैठकांचे सत्र सुरूच आहे. त्याचप्रमाणे काँग्रेस पक्षही आगामी निवडणुकांच्या तयारीला लागला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची नागपुरात ४ आणि ५ ऑक्टोबरला विचारमंथन कार्यशाळा होणार आहे.प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखालील या कार्यशाळेत विजय वडेट्टीवार आणि नितीन राऊत यांचेही मार्गदर्शनपर संबोधन असणार आहे.

### पाकिस्तानचे ४ ते ५ लढाऊ विमाने पाडली

नवी दिल्ली : पहलगामच्या हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने राबविलेल्या ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करण्यात आले. याचबरोबर आता पाकिस्तानची अनेक लढाऊ विमाने पाडल्याचीही माहिती समोर आली आहे. भारतीय हवाई दलाचे प्रमुख एपी सिंग यांनी ऑपरेशन सिंदूरच्या यशाची माहिती देत असताना अमेरिकन बनावटीचे एफ–१५, चिनचे जेएअफ–१७ अशा विमानांसह ४ ते ५ विमाने पाडली गेल्याचे म्हटले आहे.९३ व्या हवाई दलाच्या दिनानिमित्त आयोजित समारंभात बोलत असताना त्यांनी ही माहिती दिली.

### गुंड निलेश घायवळ तानाजी सावंत कनेक्शन

पुणे : 'सावंत साहेबांना मध्ये कशाला घेतोस?, पुण्यात येऊन तुझे दुकान बंद पडतो', अशी धमकी गुंड निलेश घायवळ एका व्यापाऱ्याला देत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. गुंड निलेश घायवळने एका व्यवसायिकाला ही धमकी दिल्याची माहिती समोर येत आहे. ''सावंत साहेबांना मी आमदार केलंय का?, तू त्यांना मध्ये कशाला घेतोस आधी बंगल्यावर ये. नाहीतर मी तिकडे येतो'', अशा शब्दांत व्हाट्सअप कॉल करून घायवळ याने एका व्यवसायिकाला धमकी दिली. ''मी घरी येतो नाहीतर तू घरी ये'' अशी धमकी कॉलमध्ये देत असल्याचं दिसत आहे.

## राज्यात लवकरच मतदार तपासणी मोहीम

मुंबई । प्रतिनिधी

संपूर्ण देशासह महाराष्ट्रात लवकरच होणा–या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी मतदार यादी पूर्णपणे अचूक आणि अद्ययावत करण्यासाठी निवडणूक आयोगाने मोठी मोहीम हाती घेणार आहे. या मोहिमेअंतर्गत, मतदार यादीतून मयत झालेल्या मतदारांची नावे वगळली जातील, जेणेकरून यादीतील बोगस मतदारांची संख्या कमी करता येईल. ही संपूर्ण तपासणी मोहीम निवडणुकीपूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मतदार यादीची अचूकता वाढवण्यासाठी आयोगाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आता जन्म–मृत्यू नोंदणी कार्यालयाचा

पान २ वर

# केंद्राकडून महाराष्ट्राला ६४१८ कोटी हस्तांतरित

मुंबई । प्रतिनिधी

सणासुदीच्या काळात केंद्राकडून महाराष्ट्राला कराचा एक आगाऊ हप्ता देण्यात आला आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्राच्या वाट्यापैकी ६,४१८ कोटी रुपये हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान आणि केंद्रीय अर्थमंत्र्यांचे आभार मानले. आता मराठवाड्यातील पूरग्रस्तांना मदत काही विकास कामाचे थकीत देयके आणि नवीन योजनेला हातभार लागणार का हे पाहावे लागणार आहे .

केंद्र सरकारने राज्य सरकारांना कराचे अग्रीम हस्तांतरण केले असून त्यापैकी महाराष्ट्राला ६ हजार ४१८ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. हे हस्तांतरण १० ऑक्टोबर रोजी होणा–या सामान्य मासिक हस्तांतरणाव्यतिरिक्त आहे. येणा–या सणासुदीच्या हंगामाच्या दृष्टीने आणि राज्याला भांडवली खर्च वाढवण्यास सक्षम करण्यासाठी या निधीचा वापर होईल. तसेच आपल्या कल्याणकारी आणि विकास योजनांना वित्तपुरवठा करण्यासाठी या रकमेचा राज्याला निश्चित उपयोग होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.मराठवाड्यात यंदा महापुराची

पान २ वर

# राज्यातील शेतकऱ्यांना दोन दिवसात कर्जमाफी ?

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत्या दोन दिवसात राज्यातील शेतकऱ्यांसाठी मदतीची मोठी घोषणा करणार आहेत. याबाबतची माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या आपत्तीमुळे बाधित शेतकरी सरकारी मदतीकडे डोळे लावून बसले आहेत. अशातच महाजन यांच्या वक्तव्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.



मराठवाड्यासह राज्यातील इतर भागामध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे नुकसान झाले आहे. तर, अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. अशातच महाजन यांनी

पान २ वर

## मराठा आरक्षणासाठी निजामाचे गॅझेट का?–शाहू महाराज

कोल्हापूर । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या प्रश्नात राजर्षी शाहू महाराजांनी १९०२ मध्ये काढलेल्या आरक्षण आदेशाचा उल्लेख कुठेही नाही हे दुर्दैव आहे. ज्या निजामाला आपण तीनवेळा हरवले आहे. त्याचे हैदराबाद गॅझेट आपण का स्वीकारतोय ? असा प्रश्न खासदार शाहू छत्रपती यांनी उपस्थित केला. ऐतिहासिक भवानी मंडपात मराठा आरक्षणासाठीकोल्हापूर गॅझेट लागू करण्याच्या आंदोलनाला कोल्हापूर गॅझेट, पेन, कायद्याच्या पुस्तकाचे पूजन करून सुरुवात झाली यावेळी ते बोलत होते.



यावेळी त्यांनी खंडेनवमीच्या निमित्ताने राज्यघटना आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी १९०२ मध्ये काढलेला

पान २ वर

# खराब लिखाण डॉक्टरांना न्यायालयाचे 'इंजेक्शन'

नवी दिल्ली । वृतसंस्था

डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधचिठ्ठी वाचताना केमिस्टच नाही, तर रुग्णांच्या नातेवाईकांनाही घाम फुटतो. अनेकदा डॉक्टरांचे हस्ताक्षर इतके किचकट असते की औषधाचे नाव चुकण्याची भीती असते. हीच गंभीर बाब लक्षात घेऊन पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे, जो देशभरातील रुग्णांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे.

डॉक्टरांचे वाचता न येणारे हस्ताक्षर हे रुग्णांच्या जीवासाठी धोका आहे असे स्पष्ट मत नोंदवत कोर्टाने डॉक्टरांना सर्व औषधचिठ्ठया सुवाच्य किंवा ठळक अक्षरांमध्ये लिहिण्याचे बंधनकारक केले आहे. डिजिटल प्रिस्क्रीप्शन सुविधा नसेल तर हे करावे लागेल, असेही कोर्टाने म्हटले आहे. न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले की, डॉक्टरांनी औषधचिठ्ठी स्पष्टपणे लिहिणे हे त्यांचे कर्तव्य आहे.रुग्णांची सुरक्षा सर्वोच्च आहे आणि त्यात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असे न्यायालयाने म्हटले. इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) यांनी या आदेशाशी सहमती दर्शवत प्रतिक्रिया दिली


पान २ वर

# बाप रे! एकट्या मुंबईत दसऱ्याला १०० टन सोन्याची विक्री

नवी मुंबई । प्रतिनिधी

सोन्याचे दर गगनाला भिडले असताना दस–याला गुंजभर का होईना सोने खरेदी करण्याची परंपरा सुरू ठेवत गुरुवारी विजयादशमीच्या मुहूर्तावर मुंबई सराफा बाजारात विक्रमी सोने विक्री नोंदवली गेली. दिवसभरात मुंबईत किमान १०० टन सोने खरेदी झाली. गतवर्षीच्या तुलनेत २० टन जास्त सोने लुटले गेले. गतवर्षीच्या दस–याला ८० टन सोने विक्रीची नोंद झाली होती.तर राज्यात कितीतरी पटीने सोन्याची विक्री झाली असेल.

दस–याला काहीतरी नवीन वस्तू किंवा सोने खरेदीची परंपरा आहे त्यात २४ कॅरेट सोन्याचे दर १ लाख २२ हजार रुपयांपर्यंत गेले असतानाही हा विक्रम नोंदवला गेल्याचे इंडिया बुलियन ॲण्ड ज्वेलर्स असोसिएशनचे राष्ट्रीय प्रवक्ते कुमार जैन यांनी सांगितले.



तोळ्याचे चढे भाव बघता यंदाही गतवर्षीप्रमाणेच ८० टन सोने विकले जाईल, असे वाटले होते. मात्र, मुंबईकरांनी गतवर्षीच्या उलाढालीची बरोबरी करून वर आणखी २० टन सोन्याची खरेदी नोंदवली.सोन्याच्या दरात वर्षीच्या पहिल्याच दिवशी वाढ झाल्याचे चित्र समोर आले होते. सणासुदीत सोने पहिल्या टप्प्यात लाखाचा टप्पा पार करणार असल्याचे सराफ व्यावसायिकांनी स्पष्ट केले होते. दररोज सोने तोळ्यामागे १२०० ते २००० रुपयांची भर पडत गेली आणि सोन्याने उच्चांक गाठला. सोन्याच्या दरात गत पंधरवड्यात तोळ्याला दहा ते बारा हजार रुपयांनी वाढ झाली. साडेतीन मुहूर्तांपैकी एक आणि सोने खरेदीचा खास मुहूर्त असलेल्या दस–याला जळगाव सराफ बाजारात २४ कॅरेटचा भाव प्रति दहा ग्रॅम एक लाख २१ हजार रुपयावरती गेला. चांदीचा दर किलोमागे २५००० रुपयांनी वाढून एक

पान २ वर

## मराठवाडा ऑईल केमिकल कंपनीला भीषण आग

लातूर । प्रतिनिधी

शहरातील जुन्या एमआयडीसीतील कळंब रोडवरील मराठवाडा ऑईल केमिकल कंपनीला दि. ३ ऑक्टोबर रोजी भीषण आग लागली. सुदैवाने या आगीत जीवितहानी झाली नसली तरी कंपनीचे मोठे वित्तीय नुकसान झाले आहे. लातूर शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी पोचून आग आटोक्यात आणली, अशी माहिती अग्निशमनदल अधिकारी गणेश चौधरी यांनी दिली. आग कशामुळे लागली हे अद्याप स्पष्ट सांगता येत नाही. परंतु, कंपनीतील रियाक्टरमधील बिघाडामुळे ही आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज गणेश चौधरी यांनी व्यक्त केला. ऑईल केमिकल कंपनीला आग लागल्याने काही क्षणातच या आगीने रौद्ररुप धारण केले. पाहता पाहता आगीचे रुपांतर भीषण आगीत झाले. आगीचे लोळ उठले होते. ते दुरवरुनही दिसून येत होते. या घटनेचा पंचनाम केल्यानंतरच या आगीत नेमके किती नूकसान झाले आहे. हे स्पष्ट होणार आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० सप्टेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ८५.०० क्विंटल** | | |
| २,३०० | २,८०१ | २,५६६ |
| **ज्वारी/हायब्रिड: १००.०० क्विंटल** | | |
| २,१०१ | ३,०३८ | २,४७५ |
| **मका/लोकल:५.०० क्विंटल** | | |
| २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| **तूर : १४.५० क्विंटल** | | |
| ६,२०० | ६,२५१ | ६,२३३ |
| **उडीद : ६१.०० क्विंटल** | | |
| ३,९०१ | ५,५०० | ५,०२० |
| **बाजरी: ७३.५० क्विंटल** | | |
| २,१५० | २,९३० | २,६११ |
| **मुग: १०.०० क्विंटल** | | |
| ४,८०० | ६,५५० | ५,५९५ |
| **सोयाबीन: १७.०० क्विंटल** | | |
| ४,००१ | ४,४०० | ४,१८५ |
| **हरभरा: ८.५० क्विंटल** | | |
| ४,४०० | ६,४०१ | ५,०३३ |

cmyk

## अग्रलेख

# सरकारी काम; सहा महिन्यात थांब, असे होऊ नये !

राज्याच्या काही जिल्ह्यात मध्यम स्वरुपाच्या पावसाचा (यलो अलर्ट) हवामान विभागाचा इशारा माध्यमांत प्रसिद्ध झाला आहे. राज्याच्या विविध भागात काही ठिकाणी उघडीप असू शकेल तर काही ठिकाणी हलक्या सरी कोसळतील, असे हवामान विभागाने जाहीर केले आहे. पावसाच्या कमी होणाऱ्या प्रमाणाबरोबरच शेतकऱ्यांच्या बांधावरच्या भेटी संपल्या आहेत. नेत्यांचे दौरे कमी झाले आहेत. पावसाचे प्रमाण कमी झाले तरी परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही. कारण जे नुकसान व्हायचे ते होऊन गेले आहे.

अनेक शेतकरी उद्ध्वस्त झाले आहेत. त्यांच्या हातात काही नाही आणि येण्याची शयता पावसाने हिरावून घेतली आहे. केवळ खरीपच नव्हे तर रब्बी हंगामही धोयात आला आहे. काही शेतकरी अनेक वर्षे डोके वर काढू शकणार नाहीत. बहुसंख्य शेतकरी निसर्गाच्या माऱ्यापुढे हतबल झाले आहेत. पशुधनाचे किती नुकसान झाले याची गणतीही अद्याप नाही. सरकारने तातडीने आर्थिक मदत द्यावी यासह पूरग्रस्त जिल्ह्यांमधील शेतकरी कर्जवसुलीला स्थगिती देण्याची मागणी करत आहेत. बँकांना वसुली करू दिली जाणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. नुकसानीचे पाहणी दौरे करण्याचे मंत्र्यांना दिलेले आदेश, मोबाईल किंवा ड्रोनने काढलेली छायाचित्रे पंचनाम्यासाठी ग्राह्य धरली जातील, कागदी अडथळे दूर केले जातील आणि तांत्रिक बाबींचा बाऊ न करता मदत केली जाईल, अशा काही घोषणा मुख्यमंत्र्यांनी केल्या आहेत.

सुरुवातीच्या टप्प्यातील आर्थिक मदतही जाहीर केली आहे. सरकार या संकटाकडे गांभीर्याने पाहते आहे असे चित्र यामुळे सुरुवातीच्या टप्प्यात उभे राहिले. तथापि त्यानंतरचे काही निर्णय किंवा वक्तव्ये त्याला छेद देणारे ठरू शकतील. सरकार संवेदनशीलतेने पाहत नाही अशी भावना निर्माण होऊ शकेल. पाऊस कमी झाला असला तरी बऱ्याच शेतांमध्ये अजून पाणी आहे. त्यामुळे तिथपर्यंत जाणे शक्य नाही. परिणामी पंचनाम्यांना उशीर होण्याची शक्यता मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. अतिवृष्टी आणि पुरामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडूनच प्रतिटन पंधरा रुपयांची कपात करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. तो अर्थातच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. सरकारवर टीकेचा मुद्दा ठरला आहे. कारण या निर्णयाचा फटका शेतकऱ्यांनाच बसणार आहे.

दोन-तीन दिवसांत सगळी माहिती मिळेल. त्यानंतर मदतीचे सर्वंकष निकष ठरतील आणि मदत दिली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले आहेत. यात किमान आठवडा तरी जाईल. सरकारी काम आणि सहा महिने थांब अशा शब्दात लोक सरकारी कामकाजाच्या गतीचे वर्णन करतात. तोच अनुभव यावेळी पण येईल का या साशंकतेने शेतकरी मात्र अस्वस्थ झाले आहेत. विरोधी पक्षांनी सरकारला धारेवर धरले आहे. पण सरकार कोणाचेही असो, आकडेवारीशिवाय नुकसानीसाठी मदत जाहीर केली जाऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. तथापि पीडितांची मानसिकता खालावलेली आहे. कोणत्याही प्रकारच्या आपत्तीमधील सरकारी मदतीचा पीडितांचा भूतकालीन अनुभव फारसा बरा नाही. त्यामुळे यासंदर्भातील कोणतेही व्यक्तव्य मग ते वास्तव मांडणारे का असेना पण ते लोकभावना तीव्र करणारे ठरू शकेल हे सरकारला लक्षात घ्यावे लागेल. पीडितांच्या मदतीला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल असे भावनांचे नुसते प्रगटीकरण अस्वस्थता कमी करू शकणार नाही. सरकार शेतकऱ्यांच्या बरोबर आहे.

नुकसानीचा सरकारला अंदाज आहे याचा अनुभव शेतकऱ्यांना देणे ही सरकारची जबाबदारी आहे. केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आहे. केंद्र सर्वतोपरी मदत करणार असल्याचे मंत्र्यांनी सांगितले. पण त्यासाठी मदतीचा प्रस्ताव केंद्राकडे वेळेत सादर केला जाणे आवश्यक आहे. तो तसा सादर केला जाईल अशी अपेक्षा. अतिपाऊस सोबत अनारोग्यदेखील आणतो. साथीच्या आजारांना पोषक वातावरण निर्माण करतो. प्राथमिक व त्वचारोगावरच्या औषधांचा समावेश असलेले खोके सरकार वाटणार आहे. म्हणजे मदतीचे सर्व मार्ग अद्याप घोषणेपुरतेच मर्यादित आढळतात. मदत करणार, औषधी खोके वाटणार असेच स्वरूप आहे. शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा उमेदीने उभे राहावे असे सरकारला खरेच वाटत असेल तर त्यासाठी वेळेत मदत हाती पडायला हवी. कारण पैशाचे सोंग आणता येत नाही आणि पैशाची जागा दुसरी कोणतीच मदत घेऊ शकत नाही, हे लक्षात घेतलेले बरे.

## लाडक्या बहिणींनी केवायसी करुन घ्यावी-सचिन मुळूक

बीड । प्रतिनिधी



**बीड जिल्ह्यातील सर्व लाडक्या बहिणींनी तातडीने आपल्या बँक खात्यांची केवायसी प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.**

शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना सुरू केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना राज्यभरात महिलांसाठी मोठा आधार ठरली आहे. या योजनेतून पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये शासनाकडून दिले जातात. या योजनेसाठी खात्याची केवायसी पूर्ण करणे अनिवार्य आहे. महिलांना या योजनेचा लाभ निर्विघ्नपणे मिळावा, योजना अधिक पारदर्शक व्हावी व खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी शासनानेही केवायसीवर भर दिला आहे. अनेक बहिणींचे खाते अद्ययावत नसल्याने त्यांना योजनेचा लाभ मिळण्यात अडथळे येतात. त्यामुळे प्रत्येक लाभार्थीने तातडीने केवायसी करून घ्यावी. केवायसी करताना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास महिलांनी थेट शिवसेना कार्यालयाशी संपर्क साधावा. महिलांना मदत करण्याची जबाबदारी पक्ष कार्यकर्त्यांची असून कोणतीही बहीण योजनापासून वंचित राहणार नाही असे सचिन मुळूक म्हणाले.

## अॅग्री क्लीनिक अॅग्री बिजनेसच्या माध्यमातून ग्रामीण भागातील युवकांनी उद्योग व्यवसायात उतरावे-शरद तळेकर

आष्टी । प्रतिनिधी

**ग्रामीण भागातील युवकांनी नोकरीच्या पाठीमागे न लागता स्वतःच्या पायावर उभे राहत स्वतःच्या मालकीचा उद्योग व्यवसाय सुरू करावा त्यासाठी किसान मंत्रालय भारत सरकार नाबार्ड व मॅनेज यांच्यातर्फे व अॅग्री क्लिनिक अॅग्री बिजनेस हा ४५ दिवसाचा कोर्स सुरू करण्यात आलेला आहे या माध्यमातून शेतीवर आधारित विविध उद्योग व्यवसायासाठी मार्गदर्शन व कर्ज उपलब्ध करून दिले जाते युवकांनी यामध्ये आपले करिअर घडवून नवीन उद्योग व्यवसायाला सुरुवात करावी असे प्रतिपादन शरद तळेकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.**

आष्टी येथे जयदत्त शिक्षण कृषी व जलविकास प्रतिष्ठान संचलित अॅग्री क्लीनिक अॅग्री बिजनेस व या कोर्सच्या बाराव्या बॅचचा शुभारंभ शुक्रवार दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी काकडे पाटील संकुलनामध्ये करण्यात आला यावेळी माजी जिल्हा कृषी अधिकारी तथा नोडल ऑफिसर विठ्ठलराव गुंजाळ जयदत्त प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे ज्येष्ठ पत्रकार सिताराम पोकळे व प्रमुख मार्गदर्शक पत्रकार शरद तळेकर उपस्थित होते यावेळी पुढे बोलताना पत्रकार शरद तळेकर म्हणाले की आज छोटे छोटे व्यवसायामध्येही आपल्याला यश प्राप्त करता येते आपण जिद्द मेहनत व चिकाटी ठेवल्यास कोणताही व्यवसाय लहान मोठा नसतो आपण सातत्य आणि दर्जेदारपणा जर ठेवला तर आपल्याला व्यवसायाला गती मिळते व त्यातून यश प्राप्त होत असते त्यामुळे शेतीवर आधारित कुक्कुट पालन कृषी सेवा केंद्र ,मत्स्य व्यवसाय



वेगवेगळ्या फळावर व पिकावर प्रक्रिया उद्योग यामधून उभारता येतात आजपर्यंत अकरा बॅचमधील निम्म्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करून स्वतःच्या पायावर उभा राहिले आहेत त्यामुळे आपणही ४५ दिवसांमधील हे प्रशिक्षण पूर्ण करून स्वतःचा व्यवसाय सुरू करावा असे सांगितले. यावेळी नोडल अधिकारी विठ्ठलराव गुंजाळ म्हणाले कीअॅग्री क्लिनिक अॅग्री बिजनेस हा एक स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी शासनाने राबवलेला उपक्रम आहे यासाठी आपण पूर्ण ४५ दिवस या ट्रेनिंग सेंटर राहून प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे .अतिशय दर्जेदार पणे जयदत्त शिक्षण संस्थेमध्ये हा उपक्रम राबवला जातो पदवी पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी व शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी ही जयदत्त शिक्षण जलविकास व कृषी प्रतिष्ठानने एक संधी निर्माण करून दिले आहे त्या संधीचा आपण फायदा घेऊन ज्या ठिकाणी अडचण येतील त्या अडचणी सोडवण्यासाठी संस्था व आम्ही कटिबद्ध आहोत आपल्याला वेळोवेळी जे मार्गदर्शन लागेल ते सर्व मार्गदर्शन करण्यासाठी ही संस्था तत्पर असून यासाठी या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे हे नेहमी परिश्रम घेत असतात .या कार्यक्रमाचे प्रस्ताविक या संस्थेचे अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी केले त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना या ट्रेनिंग सेंटर मधील विविध सोयी व नियमावली सांगितल्या तसेच वेगवेगळ्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनीही आपल्या समस्या व प्रश्न विचारून समजावून घेऊन या ट्रेनिंग सेंटर मधून जास्तीत जास्त फायदा घेण्याचे आवाहन केले.यावेळी अॅग्री क्लीनिक अॅग्री बिझनेस कोर्सच्या समन्वयक विद्या पोकळे उपस्थित होत्या.

## पान ६ वरून...

### शाळा, क्लासेस चालकांना

तालुक्यावर खाजगी शाळा, कोचिंग क्लासेस च्या संचालकांनी बांधिलकीतून स्वतःच पुढे यावे आणि विद्यार्थ्यांची या वर्षीची शालेय फीस संदर्भात सकारात्मक विचार करावा. गेवराई तालुक्यात गोदावरी, सिंदफणा नदीच्या पुराचा मोठा फटका बसला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. अस्मानी संकटाने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना आणि त्यांच्या पाल्यांना शाळा संस्था चालकांनी मोठे मन दाखवून, या वर्षीची शालेय फीस पूर्णत: माफ करावी, अशी माफक अपेक्षा, पालकांनी व्यक्त केली आहे.

------------

### लढा दुष्काळाशी चळवळीतर्फे

फपाळ, अभियंता निखील वीर आदींची उपस्थिती होती. ओमराजे निंबाळकर यांचा इतर राजकारण्यांनी आदर्श घ्यावा: अॅड. राज पाटील

राजकारणलीकडे जाऊन धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी तब्बल आठ दिवस पूरग्रस्त भागात जाऊन शेतकऱ्यांना मदत केली. दुःखितांची आसवे पुसली. इतर राजकारणी आलिशान गाडी, विमानातून नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. ओमराजे निंबाळकर यांचा आदर्श इतर राजकारण्यांनी घेण्याची गरज असल्याचे अॅड. राज पाटील यांनी सांगितले.

---------------

### जिल्ह्यात चिंचवण केंद्राचा नावलौकिक

२०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. ही शिक्षण परिषद जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा चिंचवण, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खेडेवस्ती व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोठरबन नंबर २ या तीन शाळांनी संयुक्तरीत्या आयोजित केली होती. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंचवण केंद्राचे कार्यतत्पर केंद्रप्रमुख तथा केंद्रिय मुख्याध्यापक सुनिल मुंडे तर मुख्य अतिथी म्हणून चिंचवण शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष कोठुळे, कोठारबन शाळेचे मुख्याध्यापक तिडके सर, पिंपळटक्का शाळेचे मुख्याध्यापक बंडू मुंडे सर, सोन्नाखोटा शाळेचे मुख्याध्यापक आश्रुबा मुंडे सर, कोठारबन शाळेचे ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश्वर आळणे सर व प्रथम इन्फोटेक फाउंडेशनचे डीगे सर हे मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे बहारदार असे सुत्रसंचालन रफिक शेख सर यांनी केले. प्रास्ताविक सुनिल मुंडे सर यांनी केले तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार महेश घोळवे सर यांनी मानले. या शिक्षण परिषदेच्या यशस्वीतेसाठी सुनिल मुंडे, सखाराम घुगे, महेश घोळवे, रफिक शेख, शितल धस, वनमाला इप्पर, बालासाहेब डोंगरे, शिवलिला तांबडे यांनी परिश्रम घेतले. अत्यंत उत्साही वातावरणात चिंचवण केंद्राची ही मासिक शिक्षण परिषद चिंचवण शाळेत संपन्न झाली.

## पान १ वरून...

### मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त

गती मिळेल,'' असे लोणीकर यांनी सांगितले. त्यांनी शेतकऱ्यांच्या वतीने पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

--------------

### मराठ्यांनी आता शासक आणि प्रशासक बनावे

होता, तो होरपळताना बघवला जात नव्हता. मी कधी नाटक केलं नाही, मी कधी समाजाला खोटं बोललो नाही. एक गोष्ट खरी आहे की, एखाद्यावेळी एक-दोन पाऊलं मागे-पुढे सरकवले. एखाद्यावेळी चूक पण झाली असेल, पण मला जिसत होतं, समाज तडफडतो आहे. लेकीबाळी, पोरंबाळं जर मोठं करायचं असेल तर, शेतीबरोबर त्याला आरक्षणाचा आधार देणं गरजेचं आहे. आम्ही रात्रंदिवस तुटून पडलो. माझ्या समाजाची इच्छा होती. त्याच्या मुलांना नोकरीपासून आणि शिक्षणापासून लांब राहायला लागू नये', असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले. 'आपल्याला जे मिळालं ते खूप मिळालं, समाधानी राहत जा. मी आणि माझा समाज आम्ही बरोबर सर्व आणलं आहे. तोडं हुशारीनं चला, खाताना विचार करा, गरम आहे की गार आहे. मराठ्यांनी यापुढे शासक बनायचं आणि प्रशासक बनायचं. शासक बनलात तर कुणाला मागायची गरज नाही पडणार. जातीला सांभाळायचं असेल तर, तुम्हाला शासक बनावं लागेल. प्रशासनामध्ये एवढी ताकद आहे, दादा जरी असला तरी त्याला प्रशासनापुढे हात जोडून उभं राहावं लागतं', असं म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या समाजाला आवाहन केलं आहे.

-------------

### दोन घास कमी खा-पण स्वाभिमानाने रहा

हाके मेघना बोर्डीकर नमिता मुंदडा भीमराव धोंडे आदींची उपस्थिती होती यावेळी संबोधित करताना मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या कि आपला मेळावा साध्या, फाटक्या अन्? कष्टकरी माणसांचा आहे, त्यांच्यासाठी यापुढेही कायम संघर्ष करण्याचा निर्धार राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज दसरा मेळाव्यातून बोलतांना केला. आपण नवरात्रात नऊ दिवस देवीची पूजा केली. त्या देवीने महिषासूर व रक्तबिजासारखा राक्षस संपवून टाकला. आजच्या कलयुगातही असे राक्षस जन्माला आलेत. त्यामुळे आपणही या जातीपातीच्या राक्षसांचा नाश केला पाहिजे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील आपलं सरकार या देशाच्या प्रत्येक नागरिकाच्या सुखदुःखात खंबीरपणाने पाठीशी राहिले आहे आणि यापुढेही राहणार आहे. त्यामुळे पूरग्रस्तांनी व शेतकऱ्यांनी चिंता करण्याची गरज नाही. आपल्या प्रत्येक नुकसानाची भरपाई निश्चित होणार आहे. सध्या रक्तबिजा सारखी जातीवादी- धर्मवादी राक्षसी वृत्ती निर्माण झाली असून सामाजिक संतुलन बिघडवण्याचे काम ही वृत्ती करीत आहे. दसऱ्याच्या निमित्ताने सामाजिक सलोखा, सौहार्द व संतुलनाची सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून करावी असे आवाहनही त्यांनी केले. सावरगाव घाट (ता. पाटोदा) येथील भगवान भक्ती गडावर पारंपारिक दसरा मेळावा नेहमीप्रमाणेच प्रचंड जनसागराच्या उपस्थितीत पार पडला, त्यावेळी जनसागराला संबोधित करताना ना. पंकजाताई बोलत होत्या. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अठरापगड जाती धर्मातील उपेक्षित, वंचित व भगवान बाबांवर निस्सीम श्रद्धा असणारे लाखो लोक मेळाव्यात उपस्थित होते. यावर्षी अतिवृष्टी व पूर परिस्थितीच्या संकटात शेतकरी असताना शेतकऱ्यांच्याच हिताचा विचार व परंपरा जपण्याच्या दृष्टिकोनातून हा मेळावा पार पडला. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांचा वसा आणि वारसा मी जपत आहे. अठरा पगड जातीच्या माणसासाठी मी लढत आहे. मुंडे साहेबांनी मला जी शिकवण दिली आहे, तो वसा आणि वारसा मी कधीही सोडणार नाही.तुम्हाला खाली मान घालायला लावणार नाही. सत्तेत असो की विरोधात, सामान्य माणसाचं हित माझ्या मनापासून कधीही दूर जाणार नाही.माझ्या मंचावर उपस्थित असलेल्या, निवडून आलेल्या माणसाच्या प्रचाराला गेले, त्याची कधी जात पाहिली नाही. जात पाहिली ती फक्त माणसाची. कारण जात पाहणं, भेदभाव करणं मी शिकलेच नाही.भगवान बाबांनी ते शिकवलं नाही आणि माझ्या बाबांनीही ते शिकवलं नाही असे पंकजाताई मुंडे म्हणाल्या. गोपीनाथराव मुंडे साहेबांचा वसा व वारसा चालवत असताना, प्रत्येक जाती-पातीच्या माणसासाठी मी नेहमीच लढत आलेले आहे. काल आमचा बोऱ्हाडे धनगर आरक्षणासाठी तिथे बसला, दोन दिवस तुमची बहीण तिथे त्याच्यासाठी बसून राहिली. गोपीनाथ मुंडेनी मराठा आरक्षणाला समर्थन दिलं होतं, आपणही मराठा आरक्षणाला तेच समर्थन दिलेलं आहे. मराठा आरक्षणाला मुंडे साहेबांनी विरोध केला नाही, आम्ही केला नाही पण आमच्या लेकरांच्या ताटातलं घेऊ नका येवढीच रास्त भूमिका व विनंती आमची आहे. राष्ट्रसंत भगवानबाबांनी 'एकर विका, पण शिक्षण शिका' अशी शिकवण आपल्याला दिली आहे. आज परिस्थिती वेगळी आहे. त्याच शिकवणीप्रमाणे माझे म्हणणे आहे की, 'दोन घास कमी खा -पण स्वाभिमानाने रहा. कोणाचे तुकडे उचलू नका. कोणाचे पैसे घेऊ नका. खोटी कामं-खोटे धंदे करू नका.चांगल्या माणसाचं चांगलंच होतं. भगवान बाबांचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी आहेत.मला तुमचा अभिमान आहे असे आवाहनही पंकजाताई मुंडे यांनी यावेळी केले.

----------

### राज्यातील शेतकऱ्यांना

केलेल्या वक्तव्यामुळे मुख्यमंत्री नेमकी कोणती मोठी घोषणा करणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टरवरील शेती पिके मातीमोल झाली आहेत. त्यामुळे शेतकरी वाढीव आर्थिक मदतीची मागणी करत आहे. याशिवाय राज्यातील शेतकऱ्यांनी संपूर्ण कर्जमाफीसाठीही रेटा लावला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री येत्या दोन दिवसात वाढीव आर्थिक मदत देणार की संपूर्ण कर्जमाफी करणार याकडे राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. गेल्या काही दिवसात राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टरवरील शेती बाधित झाली आहे. लाखो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. तर, अनेक ठिकाणी महापुरामुळे जमिनीच्या जमिनी खरडून गेल्या आहेत. अभूतपूर्व असे नुकसान झाल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. या संकटातून शेतकऱ्यांना पुन्हा उभारी घेण्यासाठी राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याची मागणी विरोधक करत आहेत. दरम्यान, अतिवृष्टीमुळे पिके वाया गेली आहेत. तर, पुरामुळे अनेक गावांमध्ये घरात पाणी शिरल्याने संसार उपयोगी वस्तू वाहून गेल्याने अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. तसेच हातातोंडाशी आलेले सोयाबीन, कापूस, तूर यासारखी पिके हातून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांचे कर्जमाफ करावे. त्याचप्रमाणे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी शिवसेना (उबाठा) चे पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. सर्व विरोधी पक्षांनी सुद्धा अशीच मागणी केली आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस याबाबत काय निर्णय घेतात याकडे अख्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. भाजपने म्हणजेच युती सरकारने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कर्जमाफी होणार की, अतिवृष्टी आणि पूरग्रस्त या निमित्ताने शेतकऱ्यांना वाढीव मदत होणार हे दोन दिवसात समजणार आहे.

-----------

### केंद्राकडून महाराष्ट्राला ६४१८

स्थिती असून शेतक-यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यांच्या मदतीसाठी वेगवेगळ्या प्रकारे निधी गोळा केला जात आहे. मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून या शेतक-यांना मदत केली जाणार आहे. मराठवाड्यातील अतिवृष्टीबाधितांसाठी ऊस उत्पादक शेतक-यांकडून पैसे गोळा करण्याचा आदेश देण्यात आला आहे. शेतक-याच्या उसामागे प्रतिटन १५ रुपये कपात केली जाणार आहे. १५ रुपयांपैकी ५ रुपये बाधित शेतक-यांना तर उर्वरित १० रुपये मुख्यमंत्री सहायता निधीत जाणार आहेत.

-------------

### राज्यात लवकरच मतदार

डेटा थेट निवडणूक यंत्रणेशी जोडला जाणार आहे. याशिवाय, आरजीआय आणि महापालिकांचा डेटा देखील आयोगाला उपलब्ध होईल. ग्रामीण भागातील तीन स्वराज्य संस्थांमधील डेटाचा वापरही या तपासणीसाठी केला जाईल. या डेटाच्या आधारावर मयत व्यक्तींची नावे स्वयंचलित पद्धतीने मतदार यादीतून वगळली जातील.बोगस मतदारांना बाहेर काढण्यासाठी आयोग स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन या विशेष तपासणी मोहिमेवर भर देत आहे. अशा प्रकारची मोहीम २५ जून २०२५ पासून बिहारमध्ये यशस्वीपणे राबवण्यात आली होती, ज्याची अंतिम यादी ३० सप्टेंबरला जाहीर करण्यात आली. याच धर्तीवर संपूर्ण देशाबरोबर महाराष्ट्रातही ही मोहीम राबवली जात आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निष्पक्ष आणि विश्वसनीय मतदार यादीच्या आधारे पार पाडण्यास मदत होणार आहे.

----------

### खराब लिखाण डॉक्टरांना

आहे. आम्ही यावर उपाय करण्यास तयार आहोत. शहरी रुग्णालयांमध्ये डिजिटल प्रिस्क्रिप्शन लागू केले गेले आहे, परंतु लहान शहरे आणि ग्रामीण भागात ते लागू करणे आव्हानात्मक आहे. गर्दीच्या सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टरांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे त्यांचे हस्तलेखन खराब होते, असाही दावा आयएमएचे अध्यक्ष डॉ. दिलीप भानुशाली यांनी केला आहे.

**रुग्णांच्या सुरक्षेला प्राधान्य**

एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने ही टिप्पणी केली. याचिकेत म्हटले होते की, डॉक्टरांच्या खराब हस्ताक्षरामुळे औषध विक्रेत्यांना औषधाचे नाव समजण्यात अडचण येते, ज्यामुळे चुकीचे औषध दिले जाण्याची शक्यता वाढते. यामुळे रुग्णाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, प्रसंगी त्याचा जीवही जाऊ शकतो.

------------

### मराठा आरक्षणासाठी निजामाचे

आदेश प्रमाण मानून यापुढे मराठा आरक्षणाचा लढा करायचा आहे. यासाठीच सातत्याने प्रयत्न करूया असा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाला ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. जयसिंगराव पवार, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती तानाजी नलवडे, व्ही. बी. पाटील, दिलीप देसाई, बाबा इंदुलकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.शाहू छत्रपती म्हणाले, आज आपण वेगळ्या पद्धतीने खंडेनवमी साजरी करत आहोत. परंपरेनुसार शस्त्रांचे पूजन करायचे असते. भारताने लोकशाही स्वीकारली असून आपल्याला त्याच रस्त्याचे जायचे आहे. मराठा आरक्षणाच्या बाबतीत संविधानामध्ये जे अडथळे आहेत ते दूर करावे लागतील तरच आरक्षणाचा प्रश्न सुटेल. मराठा समाज अनेक पातळ्यांवर मागासलेला आहे हे सिद्ध झाले आहे तसेच मराठा व कुणबी हे एकच आहेत हे मी गेले दोन वर्षे सांगत आहे. मराठा समाजाला आरक्षण देताना अन्य समाजावर अन्याय होऊ नये.

**मराठा समाजाला नेमके काय मिळाले?**

शाहू छत्रपती म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे यांनी सरकारसोबत बैठका घेतल्या. मात्र, सरकारकडून हा प्रश्न सुटलेला नाही. आतापर्यंत पुष्कळ प्रयत्न झाले आहेत, प्रत्यक्षात मराठा समाजाला काय मिळाले आणि किती मिळाले याचा अंदाज नाही. मराठा समाजाला आरक्षणाची गरज आहे यात शंका नाही. मराठा समाज मोठा आहे त्यामुळे त्यांना आरक्षण मिळालेच पाहिजे.

-------------

### बाप रे! एकट्या मुंबईत दसऱ्याला १०० टन

लाख ५१ हजार रुपयांवरती गेला. ज्यांनी गेल्या दिड वर्षात सोने खरेदी केले, अशा ग्राहकांचा मोठा आर्थिक फायदा झाला.वर्षभरात ५० ते ५५ हजार रुपयांनी वाढ झाल्यामुळे सोन्यामध्ये गुंतवणूक करणारे ग्राहक फायद्यात राहिले. गेल्या वर्षी सोन्याचे दर ७२ हजार रुपये होते तर चांदीचे दर ८० हजार रुपये होते. गुरुवारी दस-याला सोन्याचे दर जीएसटीसह १ लाख २६ हजार ५०० रुपयांवर पोहचले. घडनावळ प्रती तोळे १० हजार रुपये धरली तर एक तोळे सोने खरेदी करण्यासाठी सुमारे १ लाख ३७ हजार रुपये मोजावे लागले.हा आकडा फक्त मुंबई शहरातील आहे राज्यात तर विक्रमच झाला म्हणावा लागेल.

-------------

## मुख्याध्यापक शेख युनुस हमिद यांची शिक्षण विस्तार अधिकारी पदी पदोन्नती

माजलगाव । प्रतिनिधी

**शहरातील इंदीरा नगर जि.प.शाळेचे मुख्याध्यापक शेख युनुस हमिद यांची माजलगाव येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयात शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून दि २६ सप्टेंबर रोजी बीड जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी दिलेल्या आदेशानुसार पदोन्नती करण्यात आली आहे.**

मुख्यध्यापक शेख युनुस हमिद शहरातील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना त्यांनी मिशन जरेवाडी प्रकल्पा अंतर्गत जिल्हा परिषद इंदीरा नगर शाळेला तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविल्याने त्यांचा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहेमान यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला होता.मुख्यध्यापक शेख युनुस हमिद यांची माजलगाव येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयात शिक्षण विस्तार अधिकारी पदी पदोन्नती झाल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी महामुनी साहेब, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस दयानंद स्वामी, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे बीड जिल्हा सरचिटणीस कचरु तात्या खळगे,माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ.श्रीराम खळगे, वंचित आघाडीचे नेते अंकुशराव जाधव,प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ.मुजीब सौदागर,पत्रकार महेंद्र मस्के ,पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे,माजी नगरसेवक चाँद पटेल,सामाजिक कार्यकर्ते जाकेर पटेल यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. ०४ ऑक्टोबर २०२५



## थोडक्यात...

### सौ. डॉ.धनश्री मोरे यांना पीएचडी.

माजलगाव । प्रतिनिधी



येथील रहिवासी व छत्रपती संभाजी नगर आणि सध्या मुंबई येथे न्यायाधीश' म्हणून कार्यरत असलेल्या सौ. डॉ.धनश्री गोरख मोरे (खामकर ) यांनी '' भारतातील महिला कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी कायदे-मराठवाडा विभागाच्या विशेष संदर्भात एक चिकित्सक अभ्यास' या विषयात सादर केलेल्या शोधप्रबंधास मान्यता देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर च्यावतीने दिनांक ११ सप्टेंबर रोजी पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी हा शोध प्रबंध.डॉ. अपर्णा कोतापल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला, या पीएच.डी. संशोधनासाठी माणिकचंद पहाडे महाविद्यालयाचे प्राचार्य माणिकराव सर, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, व कर्मचाऱ्यांनी तसेच सहकारी मित्रपरिवार यांची मोलाचे सहकार्य मिळाले.सौ डॉ.धनश्री गोरख मोरे यांना या यशाबद्दल खूप खूप अभिनंदन

### तुकाराम साळवे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



तुकाराम विठ्ठलराव साळवे ( ८५) यांचे मंगळवारी दि.३० सप्टेंबर रोजी दीर्घ आजाराने केसापुरी येथे निधन झाले. अत्यंविधी बुधवारी दि.०१ ऑक्टोंबर रंऐजी सकाळी १०:०० वाजता केसापुरी (ता. माजलगाव जि.बीड) या ठिकाणी करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी,चार मुले,दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.ते माजी सरपंच विलास साळवे यांचे वडील होत.



आष्टी : शहरातील सोन्या चांदीचे प्रसिद्ध व्यापारी राजू शेठ गोल्हार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना मित्रपरिवार

### घाटनांदुर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव उत्साहात साजरा

घाटनांदुर । प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला २०२५ व्या वर्षी शंभर वर्ष पूर्ण होत आहे. या शताब्दी वर्षानिमित संघ स्वयंसेवक वर्षभर विविध कार्यक्रम करणार आहेत. विजयादशमी उत्सव हा संघाच्या सहा उत्सवांपैकी एक उत्सव आहे. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी विजयादशमी निमित्त घाटनांदुर तालुक्याचा उत्सव व सर्व गावात पथसंचालन करून मोठ्या संख्येने उत्सवात संपन्न झाले कृष्णाई मंगल कार्यालय घाटनांदुर या ठिकाणी १ ऑक्टोबर बुधवार रोजी विजयादशमी उत्सव संपन्न झाला या उत्सवासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख वक्ते म्हणुन जिल्हा कार्यवाह बिपीन क्षीरसागर ,प्रमुख पाहुणे म्हणून महेश शेटे हे होते यावेळी सर्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





माजलगाव:- जेष्ठ माकप नेत्या,माजी खासदार कॉम्रेड वृंदा कारत यांनी माजलगाव येथे धावती भेट दिली यावेळी त्यांच्या समवेत शेकापचे नेते भाई प्रा. उमाकांत राठोड,भाई प्रा.चंद्रकांत चव्हाण,कॉम्रेड भगवानराव भोजने, कॉम्रेड लोकेश कांबळे यांची उपस्थिती होती, यावेळी माजी खासदार कॉ.वृंदा करात यांचा सत्कार करताना भाई अॅड.नारायण गोले पाटील,भाई राहुल सोळंकेभाई श्रीराम शेवाळे,जनार्दन कुदळे,सोनाजी जाधव,ऍड.प्रकाश खेत्री आदि..

# शिक्षण विभागाच्या ८ केंद्रप्रमुखांना शिक्षण विस्तार अधिकारीपदी पदोन्नती

## हकीम, शिंदे, कोकणे, सेमे, यांच्यासह ८ जणांचा समावेश

बीड य प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या सेवाज्येष्ठ असलेल्या ८ केंद्? प्रमुखांना शिक्षण विस्तार अधिकारी ( वर्ग-३) पदावर पदोन्नतीने नियुक्तीचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी दिले आहेत. सदर पदोन्नती करतांना बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिशाभूल करून केल्याची तक्रार शिक्षक संघटना आणि शिक्षकांनी केली आहे. या जिल्हा परिषदेने पदोन्नती देण्यात आलेल्या खालील शिक्षकांचा समावेश आहे.

१) सय्यद हमीद कट्टुमिया, केप्रा शा, धारूर पंचायत समिती, केज २) शिंदे गंगाधर विश्वनाथ, के.प्रा.शा. आसरडोह ता.धारूर-पं.स. केज, ३) शेमे विठ्ठल एकनाथ के.प्रा.शा. रेवकी ता. गेवराई ४) कोकणे दत्तात्रय भैरू के.प्रा.शा. कानापूर ५) पल्लेवाड यादव मनोहर (नूतन परळी) जिल्हा परिषद शिक्षण विभाग, बीड, ६) चेनलवड भीमाशंकर परशुराम, ( के.प्रा.शा. मोहा, परळी) पंचायत समिती परळी.माजलगाव ७) शेळके अशोक अवधूतराव (के प्रशांत बेलंबा तालुका परळी) पंचायत समिती, परळी ८) कोपले अशोक मारुतीराव (के.प्रा.शा., घाटनांदुर) पंचायत समिती, अंबाजोगाई सदर पदोन्नती देण्यासाठी पदोन्नती समितीची बैठक अध्यक्ष तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) प्रदीप काकडे, सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी (प्रा.) भगवान फुलारी आणि अन्य सदस्यांच्या नियंत्रणाखाली झाली. समितीने सेवा जेष्ठता सूची तयार करून मान्यता देण्यात आली.

### बोगस केंद्रप्रमुखांना दिली पदोन्नती

बीड जिल्हा परिषदेने सेवाज्येष्ठता डावलून ८ केंद्रप्रमुखांना शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून पदोन्नती दिली. मात्र यातील ३ ते ४ केंद्रप्रमुख मागील काळात बेकायदेशीर आणि बोगसरित्या केंद्रप्रमुख झाले होते. सदर पदोन्नतीवर शिक्षक संघटनांनी आक्षेप घेतला आहे. या पदोन्नतीमध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप एका ऑडिओ क्लिपद्वारे करण्यात आला आहे. सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी आणि अन्य एका कर्मचाऱ्यांचा या व्हायरल ऑडिओ क्लिपची सध्या मोठी चर्चा होते.

## स्व.श्रीमती जानकीदेवी सानप सार्वजनिक वाचनालयात महात्मा गांधी जयंती साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

सावरगाव घाट येथील स्व श्रीमती जानकीदेवी सानप सार्व वाचनालय सावरगाव घाट ता पाटोदा जि.बीड येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी प्रमुख अतिथी यांच्या हस्ते गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी वाचनालयाचे कार्यवाह व महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे संचालक डॉ राजेंद्र सानप यांनी विचार व्यक्त करताना.महात्मा.गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारत स्वातंत्र्याचा ब्रिटिश सरकार विरोधातील आंदोलनाचा लढा अधिक तीव्र झाला होता.



चलेजाव सत्याग्रहामुळे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामास अधिक गती मिळाली.आज गांधीजीच्या विचारांची गरज सध्याच्या देशातील अस्थिर परिस्थितीत आवश्यक आहे. गांधीजींनी देशासाठी सर्वस्व अर्पण करून ते भारताचे राष्ट्रपिता झाले महात्मा गांधी यांच्या राष्ट्राप्रती असलेल्या संपूर्ण त्यागामुळे आज आपण स्वातंत्र्य भारताचे नागरिक म्हणून सन्मानाने जगत आहोत.महात्मा गांधी यांनी दिलेला सत्य, अहिंसा, स्वावलंबन,आणि स्वच्छतेचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे.त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करत आहे असे डॉ राजेंद्र सानप यांनी विचार व्यक्त करताना म्हटले.यावेळीअनिकेत सानप,धनंजय सानप,तात्यासाहेब सोनवणे,कालीदास खाडे,नवनाथ सोनवणे,शेख मुबारक, यांच्या सह असंख्य वाचक उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक,अभार प्रर्दशन व प्रमुख अतिथी यांचे स्वागत वाचनालयाचे कर्मचारी सोमनाथ वाल्हेकर यांनी केले.

## वृध्दजनांच्या सर्वांगीण सेवेसाठी सदैव तत्पर -भोगले

बीड । प्रतिनिधी

**श्री, विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी संस्था पोखरी संचलित घाटसावळी ता.बीड. येथील लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब वृद्धाश्रम येथे फळ वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**



दि १ ऑक्टोंबर आंतरराष्ट्रीय वृद्धव्यक्ती दिवस निमित्ताने आयोजित कार्यक्रमास यावेळी बीड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष,तथा जेष्ठ नेते मा.शिवाजी फड भाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली फळ वाटप कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून सहाय्यक आयुक्त प्रदिप भोगलेसाहेब हे होते.तर समवेत समाज कल्याण विभागाचे श्री प्रशांत उगले ,सुरज हानवटे हे उपस्थित होते.आपल्या भावनिक मनोगतात श्री भोगले म्हणाले की संस्थेचे मुख्य प्रवर्तक चंद्रकांत फड व नितीन फड यांच्या नेटक्या,व अत्यंत छान संकल्पनेतुन व सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून घाटसावळीच्या निसर्गरम्य डोंगरकुशीत हिरवळीत व छान नैसर्गिक हवेशीर वातावरणात आज २५ हुन अधिक आज्जी आजोबा या ठिकाणी आश्रय घेत आहेत.अशीच समाज सेवा व पुण्याई घडो,असे गौरवोद्गार भोगले साहेब यांनी केले, पुढे फळ वाटपानंतर वृद्धांच्या समस्यांवर प्रकाश टाकत ते म्हणाले समाजासाठी व जिवनात आज्जी आजोबा यांचे योगदान ओळखणे गरजेचे आहे.आज जगातील वृद्ध लोकांबद्दल जागरुकता निर्माण केली पाहिजे आणि त्यांच्या गरजा व हक्कांसाठी कटिबद्ध असले पाहिजे.तसेच वृद्धांना समाजात आदराने स्थान मिळावे, त्यांच्या समस्या सोडवल्या जाव्यात आणि समाजाच्या विकासात त्यांचे योगदान ओळखले जावे, यासाठी हा दिवस साजरा केला जातो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आजिनाथ शेरकर यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वश्री गोरख फड, अमोल नेहरकर,इंगळे,शहादेव फड, रामनाथ मुळे वर्षा शेरकर यांनी घेतले शेवटी पसायदान सामुदायिक पठणाने शेवट करण्यात आला.



## युसूफवडगांव येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

**युसुफवडगाव । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथील भिमनगरमध्ये काल व ६९ वा धम्मचक्र परिवर्तन दिन व अशोका विजयादशमी उत्साहात साजरा करण्यात आले.

धम्मचक्र प्रवर्तन दिन व अशोका विजयादशमीच्या निमित्ताने भिमनगर मधील बौद्ध विहारामध्ये अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मधुकर सातपुते व केतन उजगरे यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध,सम्राट अशोक, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून सामुदायिक त्रिसरण, पंचशील व बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले.यावेळी युवानेते किरण सातपुते, संजय लांडगे,अनिल उजगरे,महादेव सातपुते,राहुल उजगरे,प्रदीप सातपुते,सुमेध उजगरे, प्रज्वल सातपुते, जयराज निशिगंध, बालासाहेब सातपुते,संकेत बचुटे, पत्रकार सचिन उजगरे व समाज बांधव उपस्थित होते.

## म. गांधीजींचा अर्थविचार पर्यायी जीवन शैलीचा जाहीरनामा -यमाजी मालकर

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महापुरुषांच्या जयंती निमित्ताने ऑनलाइन इतिहास विभाग, सांस्कृतीक विभाग व एनएसएस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वर्तमान आणि महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार या विषयावरील व्याख्यानातून विचार व्यक्त करताना श्री. यमाजी मालकर म्हणाले, महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार पर्यायी जीवनशैलीचा जाहीरनामा होता. म. गांधीजींनी माणूस यंत्राचा गुलाम होऊ नये यासाठी खादी, चरखा यांचे महत्व कृतीतून समाजाला पटवून दिले. एकेकाळी भारत जगात समृद्ध



देश होता. कापड, मसाला यांचे उत्पादनात अग्रेसर होता. भारतातील संपन्नता व समृद्धीच्यामुळेच इंग्रज भारतात आले. भारतातील कच्चा माल इंग्लंडला नेऊन तलम व सुंदर कापड तयार करून भारतात विकले. व्यापाराच्या भूमिकेतून ब्रिटिशांनी भारतावर दीडशे वर्षे राज्य केले. त्यांनी वस्त्रोद्योग, सुतगिरणी, रेल्वे यांचे जाळे भारतात निर्माण केले. म. गांधीजींचा अर्थविचार हा जीवन विचार होता. मानवी शरीर यंत्र असून बुद्धी व मन हे यंत्राचे भाग आहेत. त्यास काम मिळाले तर ते अद्ययावत राहतात. भांडवलशाही देवाणघेवाण यामध्ये यांचा महत्त्वाचा भाग असल्याचे सांगितले. आज माणूस यंत्राचा गुलाम होत आहे. एआय तंत्रज्ञान यावर बोलतानाही त्यांनी यामुळे मन, बुद्धी आणि शरीर अकार्यक्षम होईल असे सांगितले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी महात्मा गांधीजींच्या विचारांची भारतालाच नव्हे तर जगाला आवश्यकता आहे. महत्माजींचे विचार व्यक्तीला स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनविणारे होते असे सांगितले. महापुरुषांच्या जयंतीनिमित्ताने महाविद्यालयातील एनसीसीच्या कॅडेट्सनी परिसरामध्ये स्वच्छता करून स्वच्छतेचा संदेश दिला. आयोजित ऑनलाइन व्याख्यानासाठी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर डॉ. डी. बी. जाधव, प्रा. बी. एस. जोगदंड, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार तसेच सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, एनसीसी कॅडेट्स व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय डॉ. राहुल साळवे यांनी तर आभार डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी मानले.

## माजलगावात शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सवाचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र नाभिक महामंडळ व बीड जिल्हा व समस्त नाभिक समाज माजलगावच्या वतीने शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले असुन रक्तदान शिबीर,शोभायात्रा काढण्यात येणार आहे.**

जीवला जीव देणा-या जिवाची जयंती उपक्रमांतर्गत शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सवात दि.०९ ऑक्टोबरला छत्रपती संभाजी महाराज चौकात सकाळी १०:०९ वाजता भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन यावेळी आमदार प्रकाश सोळंके,नाभिक महामंडळाचे अध्यक्ष कल्याण दळे,छत्रपती कारखान्याचे उपाध्यक्ष मोहन जगताप यांची उपस्थिती असणार आहे तर दु.०४:०० वाजता भव्य शोभायात्रा छत्रपती संभाजी महाराज चौक ते हनुमान चौकापर्यंत काढण्यात येणार असुन माजी सभापती जयसिंह सोळंके,माजी उपमहापौर भगवान वाघमारे, भाजपानेते ज्ञानेश्वर नाना मेंडके यांचेसह माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील,बहुजन नेते बाबुराव पोटभरे, माजी सभापती अशोक डक, माजी सभापती नितीन नाईकनवरे, सभापती जयदत्त नरवडे,शिवाजी रांजवण,डॉ.सुरेश साबळे, उपसभापती श्रीहरी मोरे,तुकाराम येवले अच्युत लाटे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.दि.०९ ऑक्टोबरला होणा-या या जयंती उत्सवात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे,जिल्हा उपाध्यक्ष किशोर दळवी,सुनिल दळवी,सतिष राउत, सागर दळवी,हनुमंत राउत,गोविंद दळवी,वैभव शिंदे, रोहित दळवी, संतोष शिंदे,नागेश खटले,रामकिसन वाघमारे, बाळासाहेब बहिरे यांचेसह महाराष्ट्र नाभिक महामंडळ, बीड जिल्हा व समस्त नाभिक समाज माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे.

## भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगावच्या वतीने ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला दि ०२ ऑक्टोबर गुरुवार रोजी सकाळी ठिक ९.०० वाजता माजलगाव शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन धम्मरॅलीस सुरुवात करण्यात आली व सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येते रॅलीचा समारोप करुन पुज्य भन्ते धम्मप्रिय थेरो चैत्यभूमी दादर मुंबई यांच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.



धम्मप्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते त्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्वचे पर्यटन सचिव के व्ही साळवे हे होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा माजलगावचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते.भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हा संस्कार उपाध्यक्ष लिलाताई उजगरे,जिल्हा महिला संस्कार सचिव आशाताई मोरे ,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,महिला जिल्हा संघटक शोभाताई भोजने, जिल्हा संघटक बी सी डोंगरे,महिला तालुका अध्यक्ष मंदाताई साळवे,शेलापुरीच्या उपसरपंच शुशिलाताई घडसे यांच्यासह धम्म उपासक -उपासिका मोठ्या संख्येने उपस्तीत होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा शहर अध्यक्ष एल आर मस्के यांनी केले प्रमुख मार्गदर्शक के व्ही साळवे यांनी अशोका विजयादशमी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची धम्मक्रांती गतीमान कशी करावी ह्या विषयी विविध मुद्याद्वारे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वंदनाताई घनघाव यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाथा घडसे ,किसन भदरगे,नितिन डोंगरे,गुलाब धाईजे मोहन काकडे, डी पी वाघमारे नाना, डी एस साळवे दादा , दयानंद साळवे,भानुदास साळवे, ,राजेभाऊ साळवे समाधान साळवे, अमोल टाकणखार , बाबासाहेब घनघाव,शिवाजी कासारीकर,सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## तांदळेश्वर विद्यालयामध्ये स्व.काकूंच्या स्मृतीदिनानिमित्त वादविवाद स्पर्धा संपन्न

बीड । प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगण संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेमध्ये आज लोकनेत्या बीड जिल्ह्याच्या माजी खासदार केशर काकू क्षीरसागर यांच्या स्मृतिदिनानिमित्त विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री श्याम डाके यांनी वाद विवाद स्पर्धेचे आयोजन केले होते अशी माहिती डाके यांनी दिली.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि प शाळेचे मुख्याध्यापक श्रीयुत क्षीरसागर लक्ष्मणराव हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून मराठी विभाग प्रमुख श्री व वामने कल्याण सर व श्री लहाने श्रीहरी सर तसेच पवार शिवाजी सर यांच्याकडे जबाबदारी होती

या कार्यक्रमाचे बहारदार संचलन श्री काशीद गणेश सर यांनी केले.वाद विवाद स्पर्धेसाठी तीन विषय देण्यात आले होते एक टेलिव्हिजन शाप की वरदान दुसरा विषय आरक्षण असावे की नसावे आणि तिसरा विषय मोबाईल वापर योग्य की अयोग्य

अशा तीनही विषयावरती अनुकूल व प्रतिकूल बाजूनी विद्यार्थ्यांनी आपले मत मांडले स्पर्धा संपन्न झाल्याच्या नंतर श्री डाके सर यांनी विद्यार्थ्यांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले अनुकूल बाजू कशी मांडावी प्रतिकूल बाजू कशी मांडावी त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी स्पर्धेला जातानी कोणते बारकावे सांभाळले पाहिजे सभादीटपणा विषय मांडणी मुद्द्या चे खंडन कसे करावे भाषेतील आरोह अवरोह अशा अनेक गोष्टींवर डाकेसर यांनी साधक बादक चर्चा करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे सचिव योगेश भैया क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयांमध्ये अनेक कार्यक्रम होत असतात जेणेकरून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचे काम त्यांना व्यासपीठ निर्माण करण्याचं काम साहेबांच्या सूचनेवरून डाकेसर व त्यांचे सर्व सहकारी विविध कार्यक्रम राबवत असतात

शेवटी बक्षीस वितरण करून सांगता झाली

प्रथम पारितोषिक आदर्श टेकडे द्वितीय बक्षीस रानमारे श्रेयश आणि तृतीय बक्षीस विजय काळे या विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळवले कार्यक्रमाचे आभार श्री पवार सर यांनीच मानले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार, दि.०४ ऑक्टोबर २०२५
४

# सोलापूरचे जिल्हाधिकारी थेट बांधवार, पूरग्रस्त भागाची पाहणी

## शेतकऱ्यांच्या वेदना घेतल्या जाणून, साडेचार लाख हेक्टर क्षेत्र बाधित

सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज माढा तालुक्यातील उंदरगाव. केवड, वाकाव या पूरग्रस्त गावांचा दौरा केला. ज्या ठिकाणी जाणं अशक्य होतं अशा ठिकाणी थेट ट्रॅक्टरमध्ये बसून ग्रामस्थांसमवेत आशीर्वाद यांनी बांधा बांधावर जाऊन पाहणी केली. सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ८८ गावांना या महापुराचा फटका बसला असून उभी पिके पूर्णपणे आडवी झाली आहे. अनेक ठिकाणी जमिनीची माती खरवडून वाहून गेलेली आहे या सर्व शेतीचे पंचनामे सध्या सुरू असून आठ ते नऊ ऑक्टोबर पर्यंत हे पंचनामे पूर्ण केले जाणार असल्याचे आशीर्वाद यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यात जवळपास साडेचार लाख हेक्टर क्षेत्रावरील पिके संपून गेली असून आता पंचनामे झाल्यावर नेमका आकडा समोर येईल असे त्यांनी सांगितले. केवड सारख्या गावात २०-२० फूट जमिनीला खड्डे पडले असून अशा ठिकाणी या शेतकऱ्याचे पुनर्वसन करण्याशिवाय दुसरा पर्याय नसल्याचेही त्यांनी सांगितले. सध्या पूरग्रस्त



गावातील बाधित नागरिकांना धान्य, दहा हजार रुपयांची रोख मदत आणि पशुपालकांसाठी चारा व मुरघास याचे वाटप सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ४ हजार ५२१ बाधित पूरग्रस्तांना सुखरूप बाहेर काढण्यात प्रशासनाला यश आले होते. वेळीच मदत पोहोचल्याने सोलापूर जिल्ह्यात एकही जीवितहानी झाली नसल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. सध्या चारा व मुरघास हा मोठ्या प्रमाणात संभाजीनगर सांगली कोल्हापूर पुणे या भागातून येत असून पशुपालकांना कुठेही चारा कमी पडणार नाही याची हमी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्यासोबत मोठ्या संख्येनं शेतकरी उपस्थित होते. सरकारनं आम्हाला तातडीने मदत करावी, आमचे पुनर्वसन करावं अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली आहे. पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या वेदना सांगितल्या. आमचं पूनर्वसन करावं अशी मागणी देखील शेतकऱ्यांनी केली आहे. आमच्या जमिनी पूर्णत खरवडून गेल्या आहेत. १५ ते २० फुटांचे खड्डे जमिनीला पडले आहे. त्यामुळं यातून काही उत्पादन येण्याची अपेक्षाच नसल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. सरकारनं आम्हाला तोकडी मदत न करता भरीव मदत करावी, या संकटातून बाहेर काढावं अशा प्रकारची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# चारा बीट : उच्च उत्पादन आणि ऊर्जा देणारे चारा पीक

आयसीएआरने विकसित केलेले चारा बीट हे कोरडवाहू प्रदेशांसाठी एक उच्च उत्पादन देणारे चारा पीक आहे. जे ४ महिन्यांत २०० टन प्रति हेक्टर उत्पादन देते. हे चारा पीक निकृष्ट दर्जाच्या माती आणि पाण्याच्या प्रदेशातही लागवड करता येते आणि चांगले उत्पादन देते. आणि या चारा पिकाच्या लागवडीसाठी खर्च सुद्धा कमी लागतो.

कोरडवाहू प्रदेशात हवामानामुळे वर्षभर हिरवा चारा मिळणे एक आव्हान आहे. राजस्थानमधील जोधपुर येथील आयसीएआर सेंट्रल एरिड झोन रिसर्च इन्स्टीटयूटने या समस्येवर चारा बीट हा एक एक आशादायक उपाय शोधला आहे. हे उच्च उत्पादन देणारे चारा पीक केवळ चार महिन्यांत २०० टन प्रति हेक्टर हिरवे बायोमास तयार करू शकते. विशेषतः आव्हानात्मक परिस्थितीसाठी विकसित केलेले, चारा बीट प्रामुख्याने पशुखाद्य म्हणून वापरले जाते आणि पशुधनाच्या दुधोत्पादनाला चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते. सध्या राजस्थान, मध्य प्रदेश, हरियाणा, छत्तिसगड, केरळ आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये त्याची लागवड केली जाते.

चारा बीटचे मुख्य वैशिष्ट्य : चारा बीट हे निकृष्ट दर्जाच्या पाणी आणि मातीतही पिकवता येते. चाऱ्याचे उच्च उत्पादन मिळते. पशुंची दूध उत्पादन क्षमता सुधारते. लागवड खर्च कमी आहे. सर्वोत्तम चारा बीट जाती : जोमोन - ही केशरी रंगाची बीटची जात पानांचे रोग आणि अवेळी बियाणे निर्मिती सारख्या समस्येला प्रतिकारक आहे. मोनरो - ही लाल रंगाची बीटची जात सुद्धा अवेळी बियाणे निर्मिती सारख्या समस्येला उत्कृष्ट प्रतिकारक आहे. जे के कुबेर - ही केशरी रंगाची बीटची उच्च उत्पादन देणारी जात असून जनावरांना पचण्यास सोपी आणि देणारी आहे. जेरोनिमो - ही पिवळ्या-केशरी बीटची जात असून बुरशीजन्य रोगास सहनशील आहे.



# आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे



ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.

उभ्या उसातील पाचट काढण्याचे फायदे : उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.

उस पाचट काढताना घ्यायची काळजी : आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. उस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही

बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात. ८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते. उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.

# आता घेता येणार रंगीबेरंगी आंब्याचा आस्वाद!

## लखनऊच्या सेंट्रल हॉर्टिकल्चर इन्स्टीटयूटने शोधले नवीन वाण

रंगीबेरंगी आंब्याच्या दोन नवीन जाती लखनऊ येथील रहमान खेडा येथे स्थित सेंट्रल इन्स्टीटयूट ऑफ सब-ट्रॉपिकल हॉर्टिकल्चरने विकसित केलेल्या आहेत. लवकरच आंब्याच्या या दोन नवीन जाती सादर होणार आहेत. ज्यामुळे भारतातील आंब्यांची यादी आणखी विस्तृत होईल. सेंट्रल इन्स्टीट्यूट ऑफ सबट्रॉपिकल हॉर्टिकल्चरने 'अवध समृद्धी'आणि 'अवध मधुरिमा' नावाच्या जाती विकसित केल्या आहेत. या नवीन वाणांमुळे भारतीय आंब्याची विविधता आणखी समृद्ध होईल. या दोन्ही आंब्याच्या जातीची फील्ड ट्रायल सुरू आहेत आणि त्या लवकरच लॉन्च केल्या जातील.

या नवीन जातींचा सर्वाधिक फायदा उत्तर प्रदेशला होईल, कारण हे भारतातील सर्वात जास्त आंबा उत्पादक राज्य आहे. आकर्षक रंग, सरासरी आकार आणि दीर्घकाळ टिकवण क्षमता यामुळे या वाणांमध्ये निर्यातीची मोठी क्षमता आहे. विशेषतः युरोप आणि अमेरिकेच्या बाजारपेठांमध्ये रंगीबेरंगी आंब्यांना खूप पसंती दिली जाते. याशिवाय आंब्याच्या या नवीन जातींना स्थानिक बाजारपेठेतही जास्त भाव मिळण्याची शक्यता आहे. यापूर्वी सीआयएसएचने 'अंबिका' आणि 'अरुणिका' आंब्याच्या जाती विकसित केल्या होत्या. ने अलीकडच्या काळात विकसित केलेल्या आंब्याच्या चारही जातींना त्यांच्या तेजस्वी रंगांमुळे वेगळी ओळख आहे.



आंब्याच्या नवीन जातीची वैशिष्ट्ये : अवध समृद्धी ही हवामान प्रतिरोधक संकरित वाण आहे, जे नियमितपणे फळ देते. त्याचा चमकदार रंग त्याला आकर्षण बनवतो आणि प्रत्येक फळाचे वजन सुमारे ३०० ग्रॅम असते. हे मध्यम आकाराचे झाड सघन बागकामासाठी योग्य आहे, १५ वर्षांनी १५ ते २० फुटापर्यंत वाढते, त्यामुळे हाताळणे सोपे होते. या जातीचा फळे पिकण्याचा काळ जुलै ते ऑगस्ट दरम्यान असतो. 'अवध समृद्धी' या जातीची सध्या क्षेत्रीय चाचणी सुरू आहे, ती लवकरच प्रसिद्ध होण्याची अपेक्षा आहे.

अवध मधुरिमा या आंब्याच्या आणखी एका जातीची प्रादेशिक चाचणी सुरू आहे आणि त्याची राज्यात अंमल बजावणी होण्यासाठी काही कालावधी लागू शकतो. अंबिका ही जात सातत्यपूर्ण फळ उत्पन्न, उच्च उत्पन्न आणि उशीरा पिकणाऱ्या जातीसाठी ओळखली जाते. त्याच्या पिवळ्या फळाच्या त्वचेला आकर्षक गडद लाल रंग असतो. तर आतील भाग गडद पिवळा, टणक, कमी तंतुमय आणि उत्कृष्ट दर्जाचा असतो. त्याचे शेल्फ लाइफ खूप चांगले आहे, प्रत्येक फळाचे वजन ३५० ते ४०० ग्रॅम दरम्यान असते. १० वर्षांच्या लागवडीनंतर, प्रत्येक झाड सुमारे ८० किलो फळे देऊ शकते. त्याच्या आकर्षक दुहेरी रंगामुळे आणि आकारामुळे, 'अंबिका' स्थानिक बाजारपेठांमध्ये लोकप्रिय आहे आणि मोठ्या प्रमाणात निर्यात देखील केली जाते. अंबिका आंब्याची वैशिष्ट्ये म्हणजे अतिवृष्टी असलेले क्षेत्र वगळता उपोष्णकटिबंधीय आणि उष्णकटिबंधीय प्रदेशात वाढू शकते. हे उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात, महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये लागवडीसाठी योग्य आहे. अरुणिका ही जात नियमित फळे देणारी परंतु उशीरा पिकणारी जात आहे. या जातीची फळे गुळगुळीत, नारिंगी-पिवळ्या त्वचेची आकर्षक लाल असतात आणि ते उत्कृष्ट चव आणि गुणवत्तेसाठी ओळखले जातात. प्रत्येक फळाचे वजन १९० ते २१० ग्रॅम दरम्यान असते आणि चांगली साठवण क्षमता असते. केशरी-पिवळ्या रंगाचा पल्प असतो आणि त्यात फायबर कमी असते. झाड उंचीला ठेंगणे आहे आणि फांद्यांचा दाट घेर आहे, ज्यामुळे ते बागकामासाठी एक आदर्श आहे. १० वर्षांनंतर प्रत्येक झाडाला सुमारे ७० किलो फळे येतात. आंब्याची 'अरुणिका' जात उपोष्णकटिबंधीय आणि उष्णकटिबंधीय हवामानातील क्षेत्रासाठी योग्य आहे. आंब्याची नवीन जात विकसित करण्यासाठी सुमारे दोन दशके लागतात. सुरुवातीच्या टप्प्यात, संस्थेतच या जातीच्या चाचण्या घेतल्या जाणार आहेत. समाधानकारक निकाल मिळाल्यानंतर, देशभरातील इतर संस्थांमध्ये चाचणीसाठी पाठविले जाणार आहेत.




### महत्वाच्या घटना

१८८२ : थॉमस एडिसन यांनी इतिहासातील पहिल्या व्यावसायिक विद्युत ऊर्जा प्रकल्प चालु केले वीजयुगाची सुरुवात म्हणून हा दिवस ओळखला जातो.
१८८८ : जॉर्ज इस्टमन याने 'कोडॅक' हा ट्रेडमार्क नोंदवला व फिल्म कॅमेर्याचे पेटंट घेतले.
१९०९ : लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या स्काऊटचा पहिला मेळावा झाला.
१९३७ : व्हेनिसमधील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'प्रभात'च्या 'संत तुकाराम' या चित्रपटाची जगातल्या तीन उत्कृष्ट चित्रपटांपैकी एक चित्रपट म्हणून निवड झाली. इतर दोन चित्रपट होते ऑस्ट्रेलियाचा 'फ्लाइंग डॉक्टर' आणि हंगेरीचा 'मारिया नोव्हेर'.
१९०९ : बालवीर चळवळीचा पहिला मेळावा झाला. लॉर्ड बेडन पॉवेल यांनी सुरू केलेली ही चळवळ थोड्याच काळात जगभर पसरुन लोकप्रिय झाली.
१९९८ : स्टॅनफोर्ड विद्यापीठातील लॅरी पेज व सर्गेइ ब्रिन या दोन विद्यार्थ्यांनी 'गुगल'ची स्थापना केली.
१९७२ : मार्क स्पिटझ हा एकाच ऑलिम्पक स्पर्धेत ७ सुवर्णपदके मिळवणारा पहिला खेळाडू बनला.
१९९८ : स्टॅनफोर्ड विद्यापीठातील लॅरी पेज व सर्गेइ ब्रिन या दोन विद्यार्थ्यांनी गुगलची स्थापना केली.
२००१ : या कंपनीने संगणक क्षेत्रातील ही बलाढ्य कंपनी २५ अब्ज डॉलर्सला विकत घेतली.
२०१२ : लंडनमध्ये मध्ये झालेल्या पॅरालंपिक स्पर्धेत भारतीय पॅरालंपिक खेळाडू गिरीशने उंच उडी क्रीडा प्रकारात भारताला पहिले पदक मिळवून दिले.
२०१३ : रघुराम राजन यांनी 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'चे २३ वे गव्हर्नर म्हणुन पदभार हाती घेतला.
२०१८ : युवा भारतीय बॅडमिंटनपटू अनुष्का पारीख आणि सौरभ शर्मा यांनी युक्रेनच्या खारकिव्ह येथे खारकिव्ह आंतरराष्ट्रीय चॅलेंजच्या मिश्र दुहेरीचे विजेतेपद पटकावले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२२१ : श्री चक्रधर स्वामी महानुभाव पंथाचे संस्थापक (मृत्यू: ७ फेब्रुवारी १२७४)
१८२५ : पितामह दादाभाई नौरोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एक संस्थापक आणि राजकीय व सामाजिक नेते, ब्रिटिश संसदेचे सदस्यत्त्व मिळवणारे पहिले भारतीय (मृत्यू: ३० जून १९१७)
१८८० : भारतीय स्वातंत्र संग्रामातील प्रसिद्ध क्रांतिकारक तसचं, प्रख्यात समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ भूपेंद्रनाथ दत्त यांचा जन्मदिन.
१८९५ : प्रसिद्ध भारतीय हिंदी लेखक व राष्ट्रकवि मैथिलीशरण गुप्त यांचे छोटे भाऊ सियाराम शरण गुप्त यांचा जन्मदिन.
१९०१ : जॅग्वोर कार चे सहसंस्थापक विल्यम लियन्स जॅग्वोर यांचा जन्म. (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९८५)
१९०५ : मिनॉक्स चे शोधक वॉल्टर झाप यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै २००३)
१९१३ : परमेश्वर नारायण तथा पी. एन. हक्सर प्रशासक व मुत्सद्दी, पंतप्रधानांचे मुख्य सचिव, योजना आयोगाचे उपाध्यक्ष (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९९८)
१९२३ : भारतीय वकील आणि राजकारणी राम किशोर शुक्ला यांचा जन्म. (मृत्यू: ११ डिसेंबर २००३)
१९३७ : शंकर सारडा साहित्यिक व समीक्षक. सारडा यांनी ६० हून अधिक पुस्तकं लिहिली असून, दोन हजांराहून अधिक पुस्तकांचं समीक्षण केलं आहे. (मृत्यू: २८ जानेवारी २०२१)
१९४१ : सुशीलकुमार शिंदे प्रसिद्ध भारतीय राजकारणी व भारतीय महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तसचं, माजी केंद्रीय गृहमंत्री
१९५२ : ऋषी कपूर सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेते
१९६२ : किरण मोरे भारतीय क्रिकेट संघाचे माजी क्रिकेटपटू आणि यष्टीरक्षक तसचं, बीसीसीआय निवड समितीचे माजी अध्यक्ष
१९६४ : भारतीय गायक-गीतकार आदेश श्रीवास्तव यांचा जन्म. (मृत्यू: ५ सप्टेंबर २०१५)
१९७१ : लान्स क्लूसनर दक्षिण अफ्रिकेचा अष्टपैलू क्रिकेटपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१२ : भारतेंदु कालीन अग्रगण्य साहित्यिकांपैकी एक सुप्रसिद्ध साहित्यकार मोहनलाल विष्णू पंड्या यांचे निधन.
१९९७ : डॉ. धर्मवीर भारती हिन्दी लेखक, कवी, नाटककार, पत्रकार व 'धर्मयुग' साप्ताहिकाचे २७ वर्षे संपादक, 'अभ्युदय' व 'संगम' या नियतकालिकांचे संपादनही त्यांनी केले. (जन्म: २५ डिसेंबर १९२६)
२००० : मोहम्मद उमर 'मुक्री' आपल्या अभिनयाद्वारे पाच दशके खळाळून हसवणारे विनोदी कलाकार व चरित्र अभिनेते (जन्म: ५ जानेवारी १९२२)
२०१२ : भारतीय लेखक सय्यद मुस्तफा सिराज यांचे निधन. (जन्म: १३ ऑक्टोबर १९३०)
२०१२ : भारतीय गायक-गीतकार हांक सूफी यांचे निधन. (जन्म: ३ मार्च १९५२)
२०१५ : भारतीय सर्जन आणि राजकारणी विल्फ्रेड डी डिसोझा यांचे निधन. (जन्म: २३ एप्रिल १९२७)

cmyk



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत



शनिवार, दि.०४ ऑक्टोबर २०२५ ५

# अतिवृष्टी नुकसानीमुळे सर्व शेतकऱ्यांना तत्काळ मदत करण्यासाठी धरणे आंदोलन

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे बाधीत शेतक-यांना तात्काळ मदत देण्यासाठी जालना जिल्हा काँग्रेस कमिटी च्या वतीने महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर,चमन येथे धरणे आंदोलन करण्यात आले व त्यानंतर जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. जालना जिल्हा काँग्रेस कमिटीने दिनांक ३ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर केले. या निवेदनात म्हटले आहे की राज्यात अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे. मात्र सरकारकडून अद्याप कोणतीही ठोस मदत झालेली नाही.



काँग्रेस पक्षाने सरकारकडे खालील मागण्या केल्या आहेत पीक नुकसानीचे सरसगट पंचनामे करून तातडीने मदत जाहीर करावी. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी. नुकसानीची माहिती दडपून टाकणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. केंद्र सरकारने तात्काळ १००% अनुदानावर मदत पॅकेज द्यावे. ज्या विहिरी अतिवृष्टीमुळे खचलेल्या त्यांना विहिरींना , किंवा मधून ५ लाखाची विनाअट मदत करावी. यावेळी खासदार डॉ कल्याण काळे यांनी प्रशासनाला इशारा दिला की, जर शेतक-यांना योग्य मदत तात्काळ दिली नाही तर रस्त्यावर उतरून सरकार विरूद्ध मोठे आंदोलन करण्यात येईल.

यावेळी खासदार डॉ कल्याण काळे,जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, महाराष्ट्र उपाध्यक्ष राजेंद्र राख, किसान काँग्रेस जिल्हाअध्यक्ष नारायण वाढेकर जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष अतिक खान, तालुका अध्यक्ष कृष्णा पडुळ अल्पसंख्यक प्रदेश उपाध्यक्ष बदर भाई चाउस, माजी सभापति अब्दुल रऊफ परसूवाले, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष इब्राहिम शेख, नगरसेवक शकील शेख, जेष्ठ नेते ज्ञानेश्वर भांदरगे, खलील शेख तालुका अध्यक्ष अजय बनकर तालुका अध्यक्ष कल्याण तायडे, तालुका अध्यक्ष लक्ष्मण मसलेकर, तालुका अध्यक्ष श्रीरंग कामठे, तालुका अध्यक्ष बाळासाहेब आकांत अध्यक्ष वसीम शेख, जेष्ठ नेते इकबाल कुरैशी, फकीरा वाघ, विष्णु भालेराव, अब्दुल हमीद, माउली इंगोल, माजी सभापती. सोपान तिरोखे,शिवाजी लोखंडे, समीर शेख, सूरज यंगटवार, बाबासाहेब सोनावने,जावेद कुरैशी, जावेद बेग, युनुस शेख, सुरेश गवली, ज्येष्ठ नेते राजेंद्र गोरे, ज्येष्ठ नेते अशोक उबाले, इरशाद शेख, अब्दुल रफीक, अब्दुल रहीम तांबोली, कलीम खान, मुफ्फसिर कुरेशी तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्यासह हे निवेदन सादर करण्यात आले.काँग्रेस कार्यकर्त्यांनी सरकारच्या निष्क्रियतेवर जोरदार संताप व्यक्त केला असून, शेतकऱ्यांच्या न्यायासाठी आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. शेतक-यांच्या विविध प्रश्नासाठी गेल्या चार दिवसान पासून आमरण उपोषण करणारे गजानन उगले यांना खासदार डॉ कल्याण राव काळे, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्यासोबत सर्व शिष्टमंडळाने भेट दिली व त्यांना काँग्रेस पक्षातर्फे पाठींबा देण्यात आला.

## पूरग्रस्तांना निरोप देताना कपिल आकात गहिवरले



परतुर। प्रतिनिधी

परतुर तालुक्यातील गोळेगाव चांगतपुरी सह इतर गोदाकाठच्या गावांना अतिवृष्टी मध्ये वेढा पडला होता. पिकासह शेती व घरातील संसार उपयोगी साहित्य नष्ट झालेल्या व जनावरांच्या चारा पाण्याचा प्रश्न निर्माण झालेल्या पूरग्रस्तांना राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी आपल्या आष्टी येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयात चहापाणी जेवणासह निवासाची व्यवस्था करून एक मानवी धर्म पाळला.

या पूरग्रस्ताची राहणे व भोजन चार दिवस चालले स्वतः जातीने जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी लक्ष देत ही पूरग्रस्तांची सर्व व्यवस्था केली आज दि.१ रोज मंगळवारी चौथ्या दिवशी गोदावरीचा पूर्व सरल्याने हे पूरग्रस्त आपल्या गावी जिल्हाध्यक्ष आकात यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करीत परतू लागले. संकटात मदत केल्याने परतताना पूरग्रस्तांच्या डोळ्याच्या कडा ओलावल्या होत्या हे दृश्य पाहून जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांचेही मन हे लावून गेले. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना कपिल आकात म्हणाले की, मी केलेली मदत ही माणुसकीतून केलेली आहे ही कुठलीही उपकार नाही गोदाकाच्या कुटुंबांची पुनर्वसन होणे गरजेचे आहे याबरोबर त्यांची संपूर्ण नुकसान भरपाई मिळणे ही गरजेचे आहे हा प्रश्न आमचे सर्व सर्व आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्याकडे निश्चित मांडून मी सोडवण्याचा प्रयत्न करीन असे सांगून मी सदैव आपल्या पाठीशी असल्याचेही यावेळी जिल्हाध्यक्ष आकात आश्वासन दिले. यावेळी सरपंच ओंकार काटे, मोहन बान प्रवीण सवणे, अशोक काटे, सत्तार मास्टर प्रल्हाद जगताप मारोतराव नवघरे मुख्याध्यापक राजेश नवल व त्यांचे सहकारी आदी उपस्थित होते.

परतूर तालुक्यातील चांगतपुरी गोळेगाव आदी गोदाकाठच्या गावातील पूरग्रस्त आष्टी येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयात चार दिवस थांबले होते त्यांची जेवण व राहण्याची सर्व व्यवस्था जिल्हाध्यक्ष कपिल आकात यांनी केली होती. चौथ्या दिवशी पाणी ओसरल्यानंतर निरोप देताना सर्वजण गहिवरले.

## आ. अर्जुनराव खोतकर यांना मंत्रीपदावर घेऊन दिव्यांग मंत्री करा-दिव्यांग संघटनेची मागणी



जालना। प्रतिनिधी

जालन्याचे आमदार अर्जुनराव खोतकर यांना मंत्रीपदावर घेऊन दिव्यांग मंत्री ची जबाबदारी देण्यात यावी असल्याचे निवेदन सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना देण्यात आले आहे सध्याचे दिव्यांग मंत्री दिव्यांगाचा प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असून दिव्यांग बाबतीत बोलायला तयार नाही यांची हकालपट्टी करून जालन्याचे आमदार अर्जुनराव खोतकर यांना दिव्यांग मंत्री पदाचे जबाबदारी देण्यात यावी असे निवेदन दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले आहे या निवेदनावर शिवसेना दिव्यांग आघाडीचे अनिल मगदुले जगदीश सातपुते शेख इस्माईल राजेश कावेटी सविता बोराडे रेणुका वाहुळकर माणिक मगर अंकुश वाकचौरे राजेंद्र कुलकर्णी, राहुल मुळे आदींच्या साक्षरी आहेत

## पंचनामे करण्यासाठी गेलेल्या तलाठ्यास झाला सर्पदंश

### विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी रुग्णालयात जाऊन केली तलाठ्याची विचारपूस

जामखेड । प्रतिनिधी

तालुक्यातील धनेगाव परीसरात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करण्यासाठी गेलेल्या एका तलाठ्यास सर्पदंश झाल्याने त्यास धनेगाव येथील ग्रामस्थांच्या मदतीने जामखेड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती समजताच विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी या हॉस्पिटलमध्ये जाऊन संबंधित तलाठ्याची विचारपूस केली तसेच हॉस्पिटल प्रशासनाला दक्षता घेण्याची सूचना केली. अनेक दिवसांपासून जामखेड तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी संकटात



सापडला आहे. शासनाने अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेती पिकांचे पंचनामे तातडीने करण्याच्या सूचना महसुल विभागाने दिल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पहाणी करुन ग्रामसेवक व तलाठी हे पंचनामे करण्याचे काम करीत आहेत.

याच अनुषंगाने आज गुरुवार दि. २ ऑक्टोबर रोजी दसऱ्याचा सण आसुनही तलाठी आकाश काशिकेदार हे जामखेड तालुक्यातील धनेगाव शिवारातील नुकसान झालेल्या शेताचे पंचनामे करत असताना सकाळी अकरा वाजताच्या सुमारास तलाठी काशिकेदार हे नदिच्या कडेने असलेल्या सुहास काळे, संदिप काळे व प्रमोद काळे यांच्या शेताकडे चालले होते. याच दरम्यान गवतात आसलेल्या सापावर तलाठी यांचा पाय पडल्याने त्यांना सदर सापाने दंश केला. त्यामुळे त्यांना लगेचच चक्कर येण्यास सुरवात झाली. ही घटना त्यांच्या सोबत असलेल्या शेतकऱ्यांच्या लक्षात आली. त्यांना शेतकऱ्यांनी तातडीने उचलुन आणत धीर देत तातडीने चारचाकी वाहनाने जामखेड येथील शिलादीप हॉस्पिटलला उपचारासाठी दाखल करण्यात आले. यावेळी त्यांना हॉस्पिटलला घेऊन जाण्यात शेतकरी सुहास काळे, संदिप काळे, वैभव काळे, अनिल काळे, पवन काळे व मनोज काळे यांनी मदत केली. घटनेची माहिती मिळताच विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी भेट देऊन तलाठी आकाश काशिकेदार यांच्या तव्यतेची विचारपूस केली. सध्या तलाठी केदार यांची प्रकृती स्थिर आहे. यावेळी तहसीलदार मच्छिंद्र पाडळे सह त्यांचे इतर सहकारी यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन तलाठी यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

### धनेगाव येथील तरुणांची कार्य तत्परता

तलाठी काशी केदार यांना सर्पदंश झाल्याचे समजताच तेथे उपस्थित असणारे धनेगाव येथील ग्रामस्थ व तरुण यांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांना पाठीवर गाडीपर्यंत आणून तात्काळ दवाखान्यात दाखल केले याबाबत त्या सर्व तरुणांचे तालुक्यातून कौतुक होत आहे. तसेच तलाठी काशी केदार यांनीही त्यांचे आभार मानले.

## पालिकाकडून लोककल्याण मेळावा

अंबड। प्रतिनिधी

योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान नगर परिषद अंबड च्या वतीने अंबड शहरातील हातावर पोट असलेल्या पथविक्रेत्यांसाठी १ऑक्टोबर रोजी पंडीत गोविंदराव जळगावकर नाट्यगृह येथे लोककल्याण मेळावा संपन्न झाला आहे. दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत अंबड शहरातील हातावर पोट असलेल्या पथविक्रेत्यांसाठी केंद्र सरकारने कोविड-१९ कालावधीत मागील ५ वर्षांपासून पीएम स्वानिधी योजना राबविण्यात आली होती.

या योजना अंतर्गत आज फेरीवाल्या लाभार्थ्यांना प्रथम टप्पा १० हजार, दुसरा टप्पा २० हजार व तिसरा टप्पा ५० हजार या प्रमाणे खेळते भांडवली कर्ज उपलब्ध करून देण्यात आले, या लाभार्थ्यांसाठी अंबड नगर



परिषदेच्यावतीने १ ऑक्टोबर २०२५ रोजी पंडीत गोविंदराव जळगावकर नाट्यगृह येथे लोककल्याण मेळावा पार पडला आहे.या मेळाव्यात पथविक्रेता लाभार्थ्यांसाठी तसेच दिव्यांग लाभार्थी व इतर नवीन लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेण्यात आले आहे. बँकेकडे प्रलंबित असणाऱ्या लाभार्थ्यांचे तात्काळ कर्ज मंजूर करून देण्याबाबत बँक अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहे, स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान राबविण्यात आले आहे, स्वानिधी से समृद्धी योजना अंतर्गत एकूण ८ योजना लिंकेज ची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांच्या योजना लिंक करण्यात आल्या आहेत.अंगीकार अभियान २०२५ ची माहिती देऊन नगर परिषद अंबड, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय व उपजिल्हा रुग्णालय अंबड यांचे संयुक्त विद्यमाने सर्व लाभार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले आहे. या मेळाव्यास नगर परिषदेचे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी संजीव मैंद यांनी सर्व योजना विषयी लाभार्थ्यांना माहिती दिली आहे. या कार्यक्रमास उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ. गोरख सुरमवार ,तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अनिल वाघमारे, आपला दवाखाना चे डॉ लाहोटी यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच नगर परिषद, उपजिल्हा रुग्णालय व आपला दवाखाना च्या सर्व अधिकारी कर्मचारी यांनी लाभाऱ्यांची आरोग्य तपासणी करून शिबिर यशस्वी केले.

## मराठवाड्यातील दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे-मराठवाडा शिक्षक संघाचे मागणी

जालना। प्रतिनिधी

मराठवाड्यात यावर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने अतिवृष्टीने अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी वर्गाचे न भूतो न भविष्यती असे नुकसान झाले आहे त्यामुळे मराठवाड्यातील दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळू खरात यांचेमार्फत निवेदनाद्वारे केली आहे.

मराठवाड्यात यावर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने अतिवृष्टीने अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी वर्गाचे न भूतो न भविष्यती असे नुकसान झाले आहे. शालांत माध्यमिक व उच्च प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी- मार्च २०२६ साठी आवेदनपत्र भरणे सुरू आहे. आस्मानी संकटात सर्वस्व गमावलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांची परीक्षा फीस भरण्याची ऐपत शेतकऱ्यांमधे राहिलेली नाही. मराठवाड्यातील शेतकरी वर्गाला आता मदतीची गरज आहे. अशा कालखंडात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मराठवाड्यातील दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करून अतिवृष्टीग्रस्त मराठवाड्यास मदतीचा हात द्यावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे,जिल्हा सचिव संजय येळवंते, कोषाध्यक्ष नारायण मुंडे,कार्याध्यक्ष फरकुंदअली सय्यद,उपाध्यक्ष जगन वाघमोडे, सहसचिव प्रद्युम्न काकड,अंबड तालुका सचिव गणेश मेहेत्रे, युवा शहराध्यक्ष सोहम बोदवडे, प्रकाश खंडागळे या व इतर जालना जिल्ह्याचे पदाधिकाऱ्यांनी राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/५५८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २२/०९/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १)अरुण मोकिंदराव झिणे सर्व्हे नं.-३५ प्लॉट नं. १२ नं.प.मि.नं.१८-९६-१२ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-९६-१२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- आवाड यांचे घर
पश्चिम : गंगाधर धायतडक यांचे घर
दक्षिण- कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तरः ओपन स्पेस

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

**जाहिर प्रगटन**
**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३२/२०२५**
**मोहन किसनराव डोके विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय कदमवाडी**

पहा
मोहन किसनराव डोके डोकेवाडा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत सुमित मोहनराव डोके यांचा दिनांक ०४/१२/२०१३ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस कदमवाडी ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कदमवाडी ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १९/०९/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १९/१०/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

**मा.श्रीमती. मनिषा एस. पठारे, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः- १३११/२०२५**
**(मार्फत विधिज्ञः श्री सी बी जाधव)**

अर्जदार :-१. विजय पि. असराजी साखरे, वय ६१ वर्षे, धंदा मजुरी, रा. कालिका नगर, नेकनुर, ता.जि.बीड,

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी मयत नामे लिलावती भ्र. असराजी साखरे या दि. २३/०३/२०२२ रोजी नेकनुर, ता. जि.बीड, येथे मयत झालेले असुन अर्जदार हा मयताचा एकमेव मुलगा आहे. मयताचे पती यापुर्वीच मयत झालेले आहेत. तसेच अर्जदारास इतर बहिण किंवा भाउ कोणीही नाही. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. आज दिनांकः- ३०/०९/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीखः- १९/११/२०१५

आदेशावरुन,

**स्वाक्षरीत**
**क. लि**

**स्वाक्षरित**
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

## जामखेड मध्ये महादौड व हिंदू दसरा मेळावा

### रावण दहन करून महादौडीने दसरा मेळाव्याचा समारोप

जामखेड । प्रतिनिधी

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान जामखेडच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी दुर्गामाता महादौड व हिंदू दसरा मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या भव्य सोहळ्यात हजारोंच्या संख्येने शिवप्रेमींनी उत्साहाने सहभाग घेतला. घटस्थापना ते विजयादशमी या कालावधीत दररोज पहाटे ५.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज पेठ, शनि चौक येथून शेकडो शिवप्रेमी दौडत लोहार देवी येथे जाऊन महाआरती करून दर्शन घेत होते. विशेष म्हणजे या वर्षी अतिवृष्टी व पावसातसुद्धा महादौड अखंड सुरू राहिली. या निष्ठेचे जामखेडकरांनी विशेष कौतुक केले.

विजयादशमीच्या दिवशी बाजारतळ दुर्गामाता मंदिरापासून महादौड निघाली. भगवे फेटे बांधून पारंपारिक वेशातील शस्त्र पथकाने ठिकठिकाणी ध्वज पूजन केले. लोहार देवी येथे शस्त्रपूजनासह लाठीकाठी, तलवार, भाला यासारख्या युद्धकलेची थरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. तसेच मुलींच्या रोप मल्लखांबने उपस्थितांचे मन मोहून टाकले. यानंतर महाआरती व रावण दहन करून मेळाव्याचा समारोप करण्यात आला. या प्रसंगी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे पांडुराजे भोसले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी येणाऱ्या गडकोट मोहिमेत हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. यंदा मोहिमेचा मार्ग लोहगडभीमगड ते राजमाची असा निश्चित करण्यात आला असल्याची माहिती त्यांनी दिली. दसरा मेळाव्याच्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची आकर्षक सजावट करण्यात आली होती. शेवटी रावण दहन करून हिंदू दसरा मेळाव्याचा समारोप झाला.





'गडकोट मोहिम ही देव, देश, धर्म व भारतीय संस्कृतीच्या संरक्षणासाठीच आदरणीय श्री संभाजीराव भिडे गुरुजींनी सुरू केली आहे. जामखेडमध्ये रस्त्यांचे काम पूर्ण झाल्यावर छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वाराचे काम हाती घेण्यात येईल. संकटाच्या काळात आम्ही सदैव मदतीस तयार आहोत. असंख्य आमच्या जाती परी संकटामध्ये विरघळून जाती या वृत्तीने आम्ही कार्य करतो. भारतीय सैन्य देशासाठी जीवाची बाजी लावतात, त्यांना आपण आपल्या कार्यातून मानवंदना द्यायला हवी.''

-पांडूराजे भोसले

**टीसी हरवला आहे**

विकास मारोती सवाशे यांचा ८ वी पासचा टी सी वडवणी बीड प्रवासादरम्यान हरवला आहे. तरी सापडल्यास ९१४६७७२५५५ या नंबरवर संपर्क करावा

**टीसी हरवला आहे**

सिद्धार्थ सुभाष देसाई या नावाने असलेले इ. १० वी पासचे ओरजनल शालेय मार्कसिट टी.सी. व अन्य महत्वाची कागदपत्रे असलेली फाईल कडा-अहिल्यानगर-नेवासा प्रवासात हरवली आहे. सापडल्यास संपर्कः ८८०६९४११३०

राज्य लोकतंत्र
शनिवार, दि.०४ ऑक्टोबर २०२५ | ६

# नवीन मच्छिंद्रनाथ मंदिराचा शीलारोहन कार्यक्रम

## नाथ भक्तांनी सढळ हाताने मदत करण्याचे आ.सुरेश धस यांचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

**साडेतीन मुहूर्तांपैकी अत्यंत मंगल असलेल्या विजयादशमीच्या मुहूर्तावर श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथगड मायंबा येथील नवीन दगडी मंदिर बांधकामाच्या शीला रोहनाचा शुभारंभ देवस्थानचे विश्वस्त आ. सुरेश धस यांचे हस्ते करण्यात आला.**

या वेळी मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष हरिभक्त परायण बबन महाराज भैरवाल मच्छिंद्रनाथ देवस्थानचे अध्यक्ष सचिव विश्वस्त माजी आमदार साहेबराव दरेकर, अ.भा.किसान संघाचे नीलेश चिपाडे,विश्वस्त ताठे आदि उपस्थित होते.. या नियोजित भव्य दिव्य नाथ समाधी मंदिराचे बांधकाम देगलूर परिसरातील उच्च दर्जाचा दगड वापरण्यात येणार आहे .. हा शीलारोहनाचा कार्यक्रम संत,महंतांच्या उपस्थितीत संपन्न झाला..



यावेळी दानशूर नाथ भाविक भक्तांनी या मंदिराच्या कामासाठी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आहे.

यावेळी बोलताना आ.धस यांनी या मंदिर बांधकामाचा अपेक्षित कालावधी साडेतीन वर्ष एवढा असून या संपूर्ण दगडी बांधकाम असलेल्या मंदिराच्या उभारणीसाठी सुमारे ७२ कोटी रूपये इतका खर्च अपेक्षित असून मंदिरासाठी लागणारे दगड देगलूरहुन आणले जात असल्याचे सांगितले.त्याला घडवणे व बसविणे याची किंमत गृहीत धरून या शिलेचा आकार आणि किंमत वेगळी राहणार असून भाविक भक्तांनी या प्रति शीला संख्या निश्चित करून आपला सहभाग नोंदवावा याविषयीची अधिक माहिती लवकरच जाहीर करण्यात येईल असे सांगत आत्तापर्यंत काही भक्तांनी हजारो सिमेंटच्या गोण्या, तर काहींनी लाखो रुपयांची देणगी देऊन सहकार्य केले आहे केले आहे. या मंदिराचा पाया १००१५० फूट एवढा असून, १०९ फूट उंच कळसावर नाथ संप्रदायाचा भगवा ध्वज फडकणार असून या कामासाठी नाथभक्तांनी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन सुरेश धस यांनी केले आहे.

# यश ढाका खून प्रकरण : ॲड. प्रकाश आंबेडकरांची ढाका कुटुंबियांसोबत भेट

बीड । प्रतिनिधी

स्व. यश देवेंद्र ढाका खून प्रकरणात पोलिस प्रशासनाने आतापर्यंत तीन आरोपींना अटक केली असली तरी दोन आरोपी अद्याप मोकाट फिरत आहेत. या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर आज (दि. २ ऑक्टोबर २०२५) छत्रपती संभाजीनगर येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांची भेट घेण्यात आली.



ढाका प्रकरणाची संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली. त्यानंतर ॲड. आंबेडकर यांनी तातडीने वकिलांशी तसेच समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त मा. प्रदीप भोगले व संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. पीडित कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी योग्य कायदेशीर मार्गदर्शन व आवश्यक प्रयत्न करण्याचे त्यांनी निर्देश दिले.

या प्रसंगी त्यांनी ढाका कुटुंबियांचे सांत्वन करत त्यांच्या सोबत खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही दिली.या भेटीला ढाका कुटुंब, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, अमरसिंग ढाका, ज्येष्ठ नेते डॉ. नितीन सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर, शहराध्यक्ष लखन जोगदंड यांच्यासह वाल्मिकी समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ढाका प्रकरणात न्याय मिळवण्यासाठीचा लढा सुरू असून तो शेवटच्या टप्प्यापर्यंत लढला जाईल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.




**बीड : कुंभारवाडी येथील चंद्रकला विनायक बोकडे वय ५९) ही महिला नदीच्या पुरात वाहुन गेल्याने तिचा तू झाला होता प्रशासनानाकडे आमदार सुरेश आण्णा धस यांनी पाठपुरावा केल्याने तातडीने मदत मिळाली त्याची मुलगी सौ.सुनंदा दिगांबर घोडके यांना ४ लाख रु.चा धनादेश आष्टीच्या तहसिलदार वैशाली पाटील यांनी प्रदान केला.यावेळी नायब तहसिलदार भगीरथ धारक,माजी सरपंच रामशेठ मधुरकर, माजी सरपंच सतीषशेठ धस, विनोद रोडे,माजी सरपंच भगवान शिनगीरे,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,उपअभियंता कृष्णा पानसंबळ व चव्हाण उपस्थित होते.**

# चिंचाळा येथील महिलेची आत्महत्या

आष्टी । प्रतिनिधी

चिंचाळा ४ वाजता राहत्या घराच्या माघिल शेतात आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन मथुरा बाई सुखदेव पोकळे आत्महत्या केली चिंचाळा गावांमध्ये पूर परिस्थितीने अतिवृष्टीमुळे आता तोंडाशी आलेले पीक वाया गेले सरकारची मदत कधी मिळणार आधीच कर्जाचा डोंगर डोक्यावर असताना नुकसान मोठ्या प्रमाणात झाल्याने हातबल होऊन मथुराबाई यांनी गळफास घेऊन आपले जीवन संपवले ५५ वय त्यांच्या पश्चात दोन मुले पती देखील मयत झालेले आहेत आष्टी तालुक्यात मागच्या काही दिवसापूर्वी अक्षरशा देव कोपल्या गत



अतिवृष्टी झाल्याने आता तोंडाशी सोयाबीन असेल उडीद असेल असे पीक अक्षरशः पाण्यात बुडाले अशीच परिस्थिती मथुराबाई पोकळे यांची झाली त्यामुळे आता जीवन संपवल्याशिवाय पर्याय नाही अशा भावनेतून त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली त्यांच्या पाश्चात दोन मुले असा परिवार आहे सरपंच पंडित पोकळे माहिती दिली महाराष्ट्रामध्ये दिवसान दिवस शेतकरी आत्महत्या चे प्रमाण वाढत आहे यामध्येच आज एका महिला शेतकरी ने आपले जीवन संपले

# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी बकरी-बोकड योजना; खाटिक समाज संघटनेचा निर्णय

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा, सोलापूर, जालना, मध्य महाराष्ट्रासह राज्यभरात पावसाने अक्षरशः हाहाकार माजवला. शेतकऱ्यांचे पीक पाण्यात वाहून गेले, जनावरं मृत्युमुखी पडली आणि आयुष्य उध्वस्त झालं. हाताशी शेती नाही, अंगणात पशुधन नाही अशा परिस्थितीत शेतकरी कुटुंबांचा विश्वास ढासळला आहे. त्यामुळे मुस्लिम खाटीक समाजाच्या अध्यक्ष अराफत शेख यांनी एक बोकड आणि एक शेळी पूरग्रस्त भागातील कुटुंबांना देण्याचा निर्णय घेतला आहे



अशा काळात सरकारकडून मदतीच्या घोषणा होतातच, पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर मदतीचा हात पुढे करणे ही खरी गरज असते. नेमकं हेच काम आता समाजातून पुढे आलेल्या घटकाने उचलून धरलं आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला हात घालत, महाराष्ट्र राज्य खाटिक समाजाने प्रत्येक शेतकऱ्याला एक बकरी आणि बोकड देण्याचा अनोखा निर्णय घेतला आहे.

ही योजना राबविण्याचा पुढाकार भाजप नेते आणि राज्य मुस्लिम खाटिक समाजाचे नेते हाजी अरफात शेख यांनी घेतला आहे. फक्त पोटभर अन्न देऊन शेतकरी उभा राहणार नाही, त्याला जगण्यासाठी नव्याने आधार द्यावा लागतो. बकरी आणि बोकड या जोडीमुळे शेतकऱ्यांना केवळ दूध मिळणार नाही, तर उत्पन्नाचाही मार्ग उघडणार आहे.पूरानंतर उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना ही मदत म्हणजे नवजीवनाची नवी सुरुवात ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकारसोबत समाजही ठामपणे उभा राहू शकतो, याचा संदेश या निर्णयातून स्पष्ट होत आहे.

# कपिलधारवाडी प्रकरणी जयदत्त क्षीरसागर यांची राज्याचे सचिव राजेश कुमार यांच्याशी चर्चा

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कपिलधार वाडीमध्ये मागील काही दिवसांपासून घरांना तडे पडणे आणि रस्त्याला मोठमोठ्या भेगा पडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावकऱ्यांनी सुरक्षिततेसाठी तीर्थक्षेत्रात स्थलांतर केले आहे,ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तात्पुरती स्थलांतराची व्यवस्था आणि नुकसान भरपाईसाठी मागणी केली आहे.ग्रामस्थांनी आज माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेऊन कपिलधार वाडीची माळीण होते की काय? अशी भिती व्यक्त केली यावेळी माजीमंत्री क्षीरसागर यांनी तातडीने राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांना संपर्क साधून याबाबत तातडीने कारवाई करून ग्रामस्थांना मदत करणे गरजेचे असल्याचे सांगितले सचिव राजेश कुमार यांनी तातडीने प्रशासनाला देखील सूचना केल्या आहेत यावेळी युवानेते डॉ योगेश क्षीरसागर,दिनकर कदम,विलास बडगे,गणपत डोईफोडे, नानासाहेब काकडे,सखाराम मस्के,चंद्रसेन नवले,गणेश नवले,आणि ग्रामस्थ उपस्थित होते



मांजरसूंबा घाटाच्या पायस्थ्याला असलेल्या कपिलधार वाडी येथील ग्रामस्थ आज माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे आले होते,त्यांनी सांगितले की,कपिलधार वाडी गावकऱ्यांनी रात्रीच स्थलांतर केले,मात्र उरलेल्या लोकांसाठी प्रशासनाने तातडीने मदत करावी, असे ग्रामस्थांनी सांगितले. रस्त्याला पडलेल्या भेगा व घरांवरील

पान २ वर

# भोजेवाडी येथे स्मशानभुमी नसल्याने भरपावसात केला अंत्यविधी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील मौजे भोजेवाडी येथे दि.२५स्प्टेबर झालेलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे परंतु या पेक्षा ही दुर्दैवी घटना म्हणजे भोजेवाडी येथे या अतिवृष्टी चालु असताना एक व्यक्ती मयत झाली सत्यभामा सुभेदार लकडे वय वर्षे अंदाजे ६० या व्यक्तीचा अंत्यविधी कार्यक्रम चक्क एक तळवट वर ठेऊन खाली चित्तेला आग देण्यात आली या घटनेने संपूर्ण आष्टी



तालुका हादरला आहे कारण नक्की आपण स्वतंत्र झालोत का...? सर्वांना सर्व सोयी मग आम्ही काय केल असा प्रश्नं या भोजेवाडी ग्रामस्थांनी केला आहे..

हे भोजेवाडी हे हिवरा ग्रामपंचायत मध्ये मोडले जाते ही ग्रुप ग्रामपंचायत असुन येथील लोकसंख्या पाचच्या

**तळवटाचा मंडप करुन दिला चितेला अग्णीडाग**

दरम्यान आहे प्रशासन व लोकप्रतिनिधी नेत्यांनी लक्ष घालुन आम्हाला लवकरात लवकर स्मशानभूमी द्यावी अशी विनंती केली आहे.

मेल्यानंतर ही शेतकरी सुखाने आग्णी डाग घेऊ शकत नाही... अंकावर कटा फुटण्यासारखी गोष्ट स्मशानभूमी नसले करणारे भर पावसात तळवट आठवण मंडप करून दिला मयत सत्यभामाकडे यांना अग्निडाग

# शाळा, क्लासेस चालकांना पूरग्रस्तांच्या मदतीची संधी

## संस्था चालकांनो गोरगरीब विद्यार्थ्यांची फीस माफ करणार का?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील विविध भागाला गोदावरी, सिंदफणा नदीच्या पुराचा मोठा फटका बसला असून, तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. अस्मानी संकटाने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना आणि त्यांच्या पाल्यांना शाळा संस्था चालकांनी मोठे मन दाखवून, या वर्षीची शालेय फीस पूर्णत: माफ करावी, अशी माफक अपेक्षा, पालकांनी व्यक्त केली आहे.



गेवराई मतदारसंघात पडलेल्या मुसळधार पावसाने शेत पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेती खरडून गेली आहे. गेवराई तालुक्यातील गोदाकाठ व सिंदफणेच्या काठावरची गावे, शेती पुराच्या पाण्यात गेल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. अनेकांचे संसार उघड्यावर आलेत. त्यामुळे, हे नुकसान भरून निघणारे नाही. खरीप हंगामातील पीके पूर्ण पणे पाण्यात गेल्याने, मोठा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याची गरज असून, गेवराई

पान २ वर

# अगोदर मुलाला संपवले, नंतर केली आत्महत्या

तलवाडा प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा तहत रामनगर येथील अमोल हौसराव सोनवणे व पायल अमोल सोनवणे या दोन्ही नवरा बायकोने चार दिवसापूर्वी घरगुती कारणावरून विषारी औषध प्रशासन केले होते अशी माहिती समोर आली आहे. त्यानंतर दि.२/१०/२०२५ रोजी दसऱ्याच्या दिवशी आपल्या घरी उपचार घेऊन परतले होते दि.३ रोजी पहाटे चार वाजताच्या दरम्यान अमोल हौसराव सोनवणे वय वर्ष ३० यांनी आपल्या पोटाच्या गोळ्याला चार महिन्याच्या मुलाला पाण्याच्या बॅरेल मध्ये टाकले त्यानंतर त्यांनी स्वतःच्या घरात गळफास घेऊन स्वतःला संपले ही घटना दुर्दैवी घडली आहे.त्याची बायको झोपित होती या घटनेचा कारण आतापर्यंत समोर आलेला नाही. अमोल सोनवणे सह चार महिन्याच्या बाळाला तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात सविच्छेदन करण्यात आले आहे. रामनगर येथे अंत्यविधी करण्यात आला आहे.या दुर्दैवी घटनेची माहिती तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलंगेकर, यांना मिळतात उपनिरीक्षक कैलास अनालदास, बीट अंमलदार पोह शेख मोहसीन, पोह नारायण काकडे,चालक पो,पवन शेळके, यांनी घटनास्थळी या घटनेचा पंचनामा केला व पुढील तपास तलवाडा पोलीस करीत आहे. या घटनेने तलवाडा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पुरग्रस्त गाव सुरूमगाव येथे मराठा सेवा संघाच्या वतीने जिवनावश्यक वस्तुंचे वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

अतिवृष्टी व महापुर अशा दुहेरी तडाख्यात सापडलेल्या माजलगाव तालुक्यातील सुरूमगाव येथे मराठा सेवा संघ जिल्हा बीड यांच्या वतीने जिवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्यात आला.

मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे माजलगाव तालुक्यातील सुरूमगाव ह्य गावचा जनसंपर्क तुटला होता. सध्या महापुराचे पाणी ओसरत आहे परंतु येथील नागरीकांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यासाठी मराठा सेवा संघ बीड यांनी 'पुरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा' या उपक्रमातुन जिवनावश्यक वस्तुंचे वाटप सुरूमगाव या ठिकाणी केले.



यावेळी श्री अशोकराव ठाकरे - विभागीय अध्यक्ष, धनंजय शेंडगे - बीड जिल्हाध्यक्ष, राहुल वायकर - संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष, मधुकर शेळके - विभागीय सचिव, संतोष डोंगरे - वारकरी परिषद बीड जिल्हाध्यक्ष, किरण सावंत, मधुकर नवले, श्री. रामकृष्ण यादव - अध्यक्ष ग्रामपंचायत अधिकारी संघटना, आनंदकुमार सिरसट सचिव ग्रामपंचायत अधिकारी संघटना यांसह गावक-यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# लढा दुष्काळाशी चळवळीतर्फे धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचा सन्मान

**वडवणी । प्रतिनिधी**

धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पूरग्रस्त भागात जे काम केले आहे त्याला तोड नाही. त्यानुषंगाने लढा दुष्काळाशी चळवळीच्या वतीने सन्मान करण्यात आला.

सामान्य माणसांशी थेट कनेक्ट खासदार अशी देशभर ख्याती असलेले खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पूरग्रस्त भागात जे काम केले त्याला तोड नाही.शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना आधार देत मदत केली. त्यानुषंगाने लढा दुष्काळाशी चळवळीचे प्रणेते ॲड. राज पाटील यांनी आज धाराशिव येथे खासदार ओमराजे निंबाळकर यांचा रोपटे आणि संत तुकाराम महाराज यांची गाथा भेट देऊन सन्मान केला.



यावेळी मुंबईच्या आरोग्यदूतचे संपादक बाबा देशमाने, सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब खंदारे, पत्रकार अशोक

पान २ वर

# जिल्ह्यात चिंचवण केंद्राला नावलौकिक मिळवून देवू - केंद्रप्रमुख मुंडे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये वडवणी तालुका हा शैक्षणिक क्षेत्रात अग्रक्रमी राहत असून याच वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्र हे अतिशय दुर्गम व डोंगरदऱ्यात असतांनाही या ठिकाणी असलेली गुणवत्ता नक्कीच सर्वांना आवाक केल्याशिवाय राहत नाही. या केंद्रातील शाळांच्या विद्यार्थ्यांनी नवोदय प्रवेश परिक्षा, सैनिकी स्कूल प्रवेश परिक्षा, विविध शिष्यवृत्ती परिक्षा, मंथन परिक्षा या सर्वच परीक्षांमध्ये नेत्रदिपक असे यश संपादित केलेले आहे.



आगामी काळातही सर्वांच्या सहकार्यातून वडवणी तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये चिंचवण केंद्राचा नावलौकिक मिळवू असा ठाम विश्वास चिंचवण केंद्राचे कार्यतत्पर केंद्रप्रमुख तथा केंद्रिय मुख्याध्यापक सुनिल मुंडे यांनी चिंचवण केंद्राच्या पाचव्या मासिक शिक्षण परिषदेत चिंचवण याठिकाणी शिक्षकांना उदबोधन करतांना व्यक्त केला.

वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्राची या शैक्षणिक वर्षातील पाचवी मासिक शिक्षण परिषद केंद्रातील जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा, चिंचवण याठिकाणी शुक्रवार दि.३ ऑक्टोबर

पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# निलेश घायवळचा वसुलीचा खतरनाक खेळ; 'या' ट्रिकने कमावली कोट्यवधीची संपत्ती

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कुख्यात गुंड निलेश घायवळ पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. कोथरूडमधील गोळीबार प्रकरणात मकोका (चउजउ-) कायद्यांतर्गत कारवाई झाल्यानंतर तो पोलिसांना चकवा देऊन परदेशात पळून गेल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. बनावट कागदपत्रे आणि नाव बदलून त्याने पासपोर्ट मिळवला, आणि आता तो स्वित्झर्लंडमध्ये लपल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे.

त्याच्या पत्नी आणि मुलाने मात्र भारतात परत येत चौकशीच्या भीतीने लपण्याचा प्रयत्न केला आहे. पण या गुंडाने एवढी अमाप संपत्ती कशी कमावली? धाराशिव जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांवर धमक्या देऊन खंडणी उकळण्यापासून ते गुंतागुंतीच्या पैशांच्या देवाणघेवाणीपर्यंत घायवाळच्या 'वसुली पॅटर्न'ने पोलिस आणि राजकीय नेत्यांना हादरवले आहे. पुणे पोलिसांनी त्याची १० बँक खाती गोठवली असून, ३८.२६ लाख रोख रक्कम जप्त केली आहे.

मकोका कारवाईनंतर पलायन, बनावट पासपोर्टचा खेळ

कोथरूडमधील रस्त्यावरील भांडणात घायवाळच्या टोळीने गोळीबार करून दोघांना जखमी केले. या प्रकरणात निलेशसह १० जणांवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाला. दरम्यान, घायवाळने आपले आडनाव बदलून आणि बनावट पत्ता दाखवून २०२० मध्ये तात्काळ पासपोर्ट मिळवला. अहिल्यानगर पोलिसांनी व्हेरिफिकेशनमध्ये 'जागेवर सापडला नाही' असा अहवाल दिला तरीही पासपोर्ट मंजूर झाला.

यामुळे पोलिस आणि पासपोर्ट कार्यालयातील हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. आता लूकआऊट



सर्क्युलर (डजउ) जारी झाल्याने त्याला अटक होण्याची शक्यता वाढली आहे. पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी सांगितल्याप्रमाणे, घायवाळने लंडनमध्ये आलिशान घर बांधले असून, तिथेही त्याचे 'साम्राज्य' पसरले आहे.

पवनचक्की कंपन्यांवर धमक्या आणि राजकीय डीलिंग

घायवाळवर हत्या, हत्येचा प्रयत्न, अपहरण, मारामारीसह १७ हून अधिक गंभीर गुन्हे दाखल आहेत. २००० च्या दशकात तो गजा मारणे याचा हातमाग होता, आणि त्यानंतर स्वतंत्रपणे गुन्हेगारी साम्राज्य उभे केले. धाराशिव जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांवर धमक्या देऊन तो 'प्रोटेक्शन मनी' म्हणून खंडणी उकळत असे. शेतकऱ्यांना भळीक घालून पैसे वसूल करणे, आणि कंपन्यांच्या गाड्या फोडणे-कर्मचाऱ्यांना मारहाण करणे हे त्याचे सिग्नेचर स्टाइल!

खंडणीचे पैसे वरदहस्त असलेल्या आमदारांना हिस्सा देऊन राजकीय संरक्षण मिळवत असे. विरोध करणाऱ्यांना शेतकऱ्यांमार्फत वसुली करायची – हीच त्याची 'ट्रिक'! एप्रिल २०२५ मध्ये धाराशिवमधील कुस्ती स्पर्धेत एका पैलवानाने त्याला सार्वजनिकपणे थप्पड मारली होती, ज्यामुळे त्याचे गुन्हेगारी नेटवर्क उघड झाले.

खंडणीचे रोख पैसे थेट हाताळणे धोकादायक झाल्याने घायवाळने गुंतागुंतीचा नेटवर्क उभारला. 'पृथ्वीराज एंटरप्राइजेस' नावाच्या फर्ममार्फत पैसे त्याच्या ड्रायव्हरच्या किंवा ड्रायव्हरच्या पत्नीच्या खात्यात जमा होत असत. हा ड्रायव्हर म्हणजे मुळशीचा सरपंच निलेश तोंडे! त्याच्या 'राईट हँड' विकी चव्हाणकडे हे व्यवहारांचे नियंत्रण असायचे. पोलिसांच्या तपासात हे उघड झाल्यानंतर बँक खाती गोठवली गेली आहेत.

## पुण्यात गुन्हेगारीचे तांडव, वर्दळीच्या ठिकाणी केला हवेत गोळीबार, व्हायरल व्हिडिओने संताप

**पुणे । प्रतिनिधी**

विजयादशमीच्या पवित्र सणाच्या निमित्ताने सीमोल्लंघन करत असताना भरदिवसा हवेत गोळीबार करण्याचा धक्कादायक प्रकार पुणे जिल्ह्यातील उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे. कोरेगाव मुळ (ता. हवेली) ग्रामपंचायत क्षेत्रात दोन पिस्तुलांचे पूजन करून हा प्रकार घडवून आणला. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

या घटनेला दोन दिवस लोटूनही पोलिसांकडे अधिकृत तक्रार न दाखल झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, महाराष्ट्राचा बिहार झाला का? असा जोरदार सवाल सोशल मीडियावर उमटत आहे. वाढती गुन्हेगारी आणि पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्था धोक्यात येत असल्याची भीती व्यक्त होत आहे.

सणाच्या नावाखाली गुन्हेगारीचा खेळ विजयादशमीला



सीमोल्लंघन ही परंपरा काही भागांत प्रतीकात्मकपणे साजरी केली जाते, ज्यात प्राचीन काळातील सीमा ओलांडण्याच्या स्मृतींना उजागर केले जाते. मात्र, कोरेगाव मुळ गावात ही परंपरा गुन्हेगारीला आळा घालण्याच्या नावाखाली हिंसेत बदलली. व्हायरल व्हिडिओनुसार, दुपारी सुमारे २ वाजता एका व्यक्तीने दोन पिस्तुलांचे पूजन करून हवेत गोळीबार केला. गर्दीच्या ठिकाणी हा प्रकार घडला आहे. या घटनेमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक शेतकरी आणि व्यावसायिकांमध्ये भीती पसरली आहे.

## सासवड ते सोनोरी रस्त्यावरून गावकरी आक्रमक!

### खड्ड्यांमध्ये झाडं लावून ग्रामस्थांचा प्रशासनाला सज्जड

**सासवड । प्रतिनिधी**

सासवड ते सोनोरी रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात रस्त्यांवरील खड्ड्यांचा आकार वाढत चालला आहे. या पार्श्वभूमीवर सोनोरी ग्रामस्थांनी खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून प्रशासनाचा निषेध व्यक्त केला.खड्ड्यांबाबत ठोस निर्णय घेतला नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असाही इशारा ग्रामस्थांनी दिला.यंदाच्या पावसाळ्यात सासवड ते सोनोरी रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. पाच किलोमीटरच्या मार्गावरील खड्ड्यांमुळे वाहन चालकांना मार्गक्रमण करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या संदर्भात प्रशासनाकडे वारंवार



तक्रारी केल्या. मात्र, प्रशासन तात्पुरती डागडुजी करते. पुन्हा पावसात खड्ड्यांचा आकार वाढत जातो. त्यामुळे वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. याचा निषेध नोंदविण्यासाठी सोनोरी ग्रामस्थांनी अनोखे आंदोलन केले.सोनोरी गावात रोडवर पडलेला खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करीत प्रशासनाचा निषेध नोंदविला. यावेळी माजी सरपंच बाळासाहेब काळे, भारत मोरे, सतीश शिंदे, लक्ष्मण पवार, दीपक झेंडे, सुनील शिंदे, परसराम आढाळगे, रमेश काळे, तेजस कामठे, अर्जुन काळे, विलास काळे, किसन काळे, अर्जुन काळे, नंदकुमार शिंदे, ग्रामस्थ उपस्थित होते.

## एफ.सी. रोडवर बॉम्ब ब्लास्टपासून एअरपोर्ट हायजॅकपर्यंत सराव



**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पुणे पोलिसांनी आज विविध ठिकाणी दणदणीत मॉक ड्रिल आयोजित केली. बॉम्ब ब्लास्ट, अतिरेकी हल्ला आणि विमान हायजॅक अशा गंभीर परिस्थितींना तोंड देण्यासाठी पोलिस दलाची तयारी किती सक्षम आहे, हे पाहण्यासाठी हा सराव करण्यात आला.

सकाळी दुपारी २ वाजता एफ.सी. रोड-डेक्कन पोलीस स्टेशन परिसरात आणि २.३० वाजता एम.जी. रोड, लष्कर पोलीस स्टेशन हद्दीत बॉम्ब ब्लास्ट झाल्याचे गृहीत धरून कारवाई करण्यात आली. या ठिकाणी त्वरित नियंत्रण मिळवून पोलिसांनी परिस्थिती सुरक्षित केली. यानंतर सायंकाळी ४ वाजता विश्रांतवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत ठ अए येथे अतिरेक्यांनी वरिष्ठ शास्त्रज्ञांना ओलीस धरून केलेल्या दहशतवादी हल्ल्याचा सराव राबवण्यात आला. निगोशिएशन टीमने ठिकाणी पोहोचून अतिरेक्यांसोबत चर्चा सुरू केली.

दरम्यान, सायंकाळी ६.४० वाजता विमानतळ पोलीस स्टेशनच्या हद्दीत पुणे एअरपोर्टवर हायजॅक झालेल्या इंडिगो विमानाची आपत्कालीन लँडिंगची परिस्थिती निर्माण करण्यात आली. विमानातील प्रवाशांना ओलीस धरल्याचे गृहीत धरून पोलिसांची निगोशिएशन टीम विमानतळावर दाखल झाली. या सर्व घटना पूर्णतः डमी असून, ही पोलिसांची मोठी एुशीलळीश ऊेळश्र्र असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांनी घाबरून न जाता अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.


## गौतमी पाटीलवर मरगळे कुटुंबीयांचा गंभीर आरोप,

### कारने धडक दिल्यानंतर चौकशी तर सोडाच पण एक मेसेजही नाही

**पुणे ।प्रतिनिधी**

नृत्यांगना गौतमी पाटील हिच्यावर पुण्यातील मरगळे कुटुंबीयांनी गंभीर आरोप केले आहेत. गौतमी पाटील (ॠर्रीीींराळ झरींळश्र) हिच्या कारने धडक दिल्यानंतर रिक्षा चालक गंभीर जखमी झाला आणि तो रुग्णालयात उपचार घेत आहे. एवढा मोठा अपघात झाला असतानाही गौतमी पाटील हिच्या टीमकडून कोणतीही चौकशी करण्यात आली नाही, किंवा साधा एक मेसेजही आला नाही असा आरोप रिक्षा चालकाच्या कुटुंबीयांनी केला. तसेच या प्रकरणी पोलिसही सहकार्य करत नसल्याचाही आरोप करण्यात आला.

पुण्यात नृत्यांगना गौतमी पाटीलच्या वाहनाने ३० सप्टेंबर रोजी एका रिक्षाला वडगाव पुलाजवळ मागून जोरदार धडक दिली. त्यामध्ये रिक्षाचालक मरगळे हे गंभीर जखमी झाले. त्यानंतर त्यांच्यावर पुण्यातील दीनानाथ रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. या अपघातात रिक्षात



बसलेले इतर दोघेही जखमी झाल्याची माहिती आहे.

पोलीस सहकार्य करत नाहीत

गौतमी पाटील हिच्या कार चालकाची चूक असताना हा अपघात झाला. मात्र या संपूर्ण प्रकरणाची गौतमी पाटीलच्या टीमकडून दखल घेण्यात आली नाही. तसेच पोलिसांकडून सीसीटीव्ही उपलब्ध होत नाही, पोलीस योग्य ते सहकार्य करत नाहीत असा आरोप आता रिक्षाचालक मरगळे यांच्या कुटुंबीयांनी केला.

गौतमी कारमध्ये नव्हती

पुण्यातील मुंबई-बंगळूरू राष्ट्रीय महामार्गावरील वडगाव पुलाजवळ हा अपघात झाला. पण अपघातावेळी कारमध्ये गौतमी पाटील नव्हती अशी माहिती समोर आली आहे. एका हॉटेल समोर थांबलेल्या रिक्षाला कारने धडक दिली.

अपघात नेमका घडला कसा?

पुण्यातील मुंबई-बंगळूरू राष्ट्रीय महामार्गावरील वडगाव पुलाजवळ एका हॉटेलसमोर समोर एक रिक्षा उभी होती. त्यात रिक्षाचालकासह दोन प्रवासी होते. मागून आलेल्या गौतमी पाटीलच्या भरधाव कारनं उभ्या असलेल्या रिक्षाला पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जबर होती की, यामध्ये रिक्षाचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. या अपघातात रिक्षाचालकासोबतच रिक्षातील दोन प्रवासीही गंभीर जखमी झाले.

## मराठवाडा जनविकास संघाकडून १००० हून अधिक पूरग्रस्त कुटुंबांना मदत

### शालेय साहित्यासाठी समाजाने पुढे येण्याचे अरुण पवार यांचे आवाहन

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

मराठवाडा जनविकास संघ (महाराष्ट्र राज्य) आणि मराठवाडा मुक्तीसंग्राम समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाड्यातील पूरग्रस्त भागांमध्ये 'सेवा हीच ईश्वर पूजा' या भावनेतून अत्यावश्यक मदतीचे मोठे कार्य हाती घेण्यात आले असून, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरुण पवार यांच्या नेतृत्वाखाली एक हजार पुरग्रस्त कुटुंबांना धान्य किट आणि अत्यावश्यक साहित्याचे थेट गावा-गावांत जाऊन वाटप करण्यात आले. यामध्ये तांदूळ, डाळी, बेसन, तेल, साखर, मीठ, मिरची पावडर यांसारख्या धान्यासोबतच ब्लँकेट, चटई, साडी, टॉवेल आणि प्रातिनिधिक स्वरूपात शालेय साहित्याचा समावेश आहे.

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील कोळवाडी, ब्रम्हनाथ बोरगाव, गात शिरापूर तसेच धाराशिव जिल्ह्यातील भूम व परंडा तालुक्यात देवगाव ( खुर्द) व वाघेगव्हाण या गावांमध्ये तहसीलदार निलेश काकडे, नायब तहसीलदार पांडुरंग मांडेकर, प्रकाश इंगोले, शाहुराज कदेरे, युवराज माने, बाळासाहेब काकडे, संजय माने, गोकुळ शितोळे, संतोष भोरे, गणेश गंगा विठ्ठल, विवेक पाटील, सुशांत क्षीरसागर, अशोक भोरे, शंकर तांबे, संतोष तांबे, मनोज मोरे, चंद्रकांत मोरे, सतीश मुरकुटे, सूर्यकांत कुरूलकर, दत्तात्रय धोंडगे, वामन भरगंडे, सखाराम वालकोळी, सुग्रीव पाटील, बळिराम कातंगळे, अनिताताई पांचाळ, केशव बोधले, गोविंद तांबवडे, रंगनाथ आवारे, लक्ष्मण जाधव, जीवन बोराडे, कृष्णा जाधवर, सचिन स्वामी, तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत किट वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी 'शालेय साहित्य' मदतीची गरज :

पूरग्रस्त भागात अन्नधान्य व कपडे मिळाल्याने जगण्याचा आधार मिळाला असला, तरी परिस्थिती पाहता आता शालेय साहित्याची तीव्र गरज जाणवत आहे. पूर ओसरल्यावर विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबायला नको, या विचारातून मराठवाडा जनविकास संघाने आता 'मन आणि बुद्धी पोसली पाहिजे' या उद्देशाने शालेय साहित्य संकलनाचा नवा संकल्प केला आहे. अरुण पवार यांनी विविध देवस्थाने, प्रार्थनास्थळे आणि मंदिर ट्रस्टला या कार्यात सक्रिय होण्याची विनंती केली आहे. येत्या ८ ते १० ऑक्टोबर या कालावधीत शेतकऱ्यांसाठी धान्य, गरजू वस्तू आणि विद्यार्थ्यांसाठी वह्या, पुस्तके, दप्तर, स्टेशनरी यासारख्या साहित्याचा पूर्ण संच घेऊन मदत टेम्पो रवाना होणार आहे. नागरिकांनी या 'यज्ञात फूल न फुलाची पाकळी' म्हणून आपल्या इच्छेने मदत अरुण कन्स्ट्रक्शन कार्यालय, पिंपळे गुरव, पिंपरी चिंचवड या ठिकाणी जमा करावी, असे आवाहन अरुण पवार यांनी केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत पिंपळे गुरव येथील नवचैतन्य हास्ययोग परिवार शाखा क्र. ७०चे शाखाप्रमुख मारुती घुगे आणि संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघातर्फे पूरग्रस्तांसाठी शैक्षणिक साहित्य देण्यात आले. यावेळी संघाचे अध्यक्ष श्रीकृष्ण फिरके, उपाध्यक्ष चांदमल सिंघवी, कार्याध्यक्ष पोपटराव चव्हाण, अरुण चौधरी, दामोदर राणे, अविनाश सोरटे, कुंभार गुरुजी आदी उपस्थित होते.

## आकुर्डीत ३५ फुटी रावणाचे दहन

**पिंपरी । प्रतिनिधी**

शिवसेना नगरसेवक प्रमोद कुटे यांच्या वतीने विजयादशमी निमित्त ३५ फुटी रावणाचे दहन करण्यात आले. तसेच प्रभु श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांची अश्वरथ व ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघटक मिलिंद देशपांडे, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजित बारणे, हिंजवडीचे माजी सरपंच विक्रम साखरे, उद्योजक रवींद्र नामदे, विठ्ठल साखरे, सामाजिक कार्यकर्ते विशाल काळभोर, सागर धुमाळ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमोद कुटे यांच्या वतीने दवर्षी नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. विजयादशमी निमित्त प्रभु श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांची अश्वरथ व ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात





आली. यावेळी सीता हरण, रावण वधाचा जिवंत देखावा सादर करण्यात आला. त्यानंतर ३५ फुटी रावणाचे दहन करण्यात आले. देखावा, मिरवणूक आणि रावण दहन पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. प्रमोद कुटे म्हणाले, आकुर्डीत मोठे, प्रशस्त रुग्णालय उभारले आहे. त्यामुळे नागरिकांना दर्जेदार उपचार मिळत आहेत. या भागात सिमेंट काँक्रीटचे अंतर्गत रस्ते केले. पाळखी तळ, कमान केली आहे. पोलिसांच्या मदतीने परिसरातील गुन्हेगारी कमी करण्यात यश आले आहे. या भागाचा आणखी विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे यंदाचे शताब्दी वर्षे आहे. स्वयंसेवक पर्यावरण संरक्षण, कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, नागरी कर्तव्ये आणि 'स्व'बोध यासाठी कार्यरत आहेत. शताब्दी वर्षानिमित्याने संघातर्फे या पाच प्रमुख मुद्द्यांवर समाजजागृती करण्यात येत असल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघटक मिलिंद देशपांडे यांनी सांगितले.

## तब्बल ७० किलो चांदीची चोरी, आरोपीला उत्तर प्रदेशातून केली अटक, खडक पोलिसांची मोठी कामगिरी

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील गुरुवार पेठेतील तब्बल ४० वर्षे जुन्या असलेल्या सराफी पेढीवर चोरट्यांनी डल्ला मारुन तब्बल ७० किलो चांदीचे दागिने चोरी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पुण्यातील खडक पोलिसांनी एकाला उत्तर प्रदेशातून बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्याकडून ३६ किलो ४४२ ग्रॅम चांदी जप्त केली आहे. चोरी केलेली चांदी त्याने उत्तर प्रदेशातील त्याच्या घरी नेली होती.

चोरट्यांनी तीन पोती भरून ६७ लाख ६० हजार रुपये किमतीची ७० किलोहून अधिक दागिन्यांची चोरी केली

गुन्ह्यातील इतर आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. राजेश महाराणीदिन सरोज (३६, रा. माघी चैनगड, थाना महेशगंज, ता. कुंडाख जि. प्रतापगड, उत्तरप्रदेश) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. १४ सप्टेंबर व १५ सप्टेंबर रोजी मध्यरात्री चोरट्यांनी तीन पोती भरून ६७ लाख ६० हजार रुपये किमतीची ७० किलोहून अधिक दागिन्यांची चोरी केली. यात ६२ लाखांची चांदी तर ५ लाखांच्या रोकडचा समावेश होता. या चांदीनी



भरलेली पोती (सिमेंटच्या गोणीच्या आकाराची) वाहून नेतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. तेव्हापासून पोलिस आरोपींच्या मागावर होते. घटनास्थळ व आजूबाजूच्या परिसरातील वेगवेगळ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून तांत्रिक तपास करण्यात आला. यातील संशयित आरोपींनी गुन्हा केल्यानंतर पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी कपडे बदलून पुणे रेल्वे स्टेशन येथून रेल्वेने उत्तर प्रदेश येथे गेले असल्याचे दिसून आले. अजून काही आरोपींचा शोध खडक पोलीस करत आहेत.


## तानाजी सावंतला मध्ये का घेतोस?

## निलेश घायवाळच्या कॉलने राजकीय वर्तुळात खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कुख्यात गुंड निलेश घायवळ पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. कोथरूडमधील गोळीबार प्रकरणात मकोका कायद्यांतर्गत कारवाई झाल्यानंतर तो पोलिसांना चकवा देऊन परदेशात पळून गेल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. बनावट कागदपत्रे आणि नाव बदलून त्याने पासपोर्ट मिळवला, आणि आता तो स्वित्झर्लंडमध्ये लपल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे.

दरम्यान, निलेश घायवळचे एक-एक कारनामे आता समोर येत आहेत. धाराशिवमधील एका व्यावसायिकाला कॉल करुन धमकी दिल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या कॉलमध्ये घायवाळने आमदार तानाजी सावंत यांचे नाव घेऊन धमकावले असून, तानाजी सावंतला मध्ये का घेतोस? मी घरी येतो नाहीतर तू घरी ये अशी शिवीगाळ करत धाराशिवमधील




धंदे बंद करण्याची धमकी दिली आहे. या व्हिडिओमुळे राजकीय नेत्यांच्या गुंडांशी साटेलोट्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

तानाजी सावंतला मध्ये का घेतोस?

धाराशिवमधील एका व्यावसायिक 'दिनेश' याला घायवाळने व्हाट्सअॅप कॉल केला. याचा व्हिडिओ रेकॉर्ड करून सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे. कॉलमध्ये दिनेशने कदाचित तानाजी सावंत यांचे नाव घेतले असावे, त्यावर घायवाळने संताप व्यक्त करत म्हटले, आत्ता या परिस्थितीत तानाजी सावंतला मध्ये का घेतोस? मी घरी येतो नाहीतर तू घरी ये शिवीगाळ करत तू इकडे धंदा करायचा नाही, पुण्यात जाऊन धंदे कर तुझे पुण्यातील धंदे बंद करतो.

दुकाने बंद करण्याची धमकी

या धमकीत घायवाळने स्पष्टपणे सावंत यांचे नाव घेऊन व्यावसायिकाला इशारा दिला असून, त्याच्या दुकाने बंद करण्याची धमकी दिली आहे. नेमका हा 'दिनेश' कोण आहे, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही, पण व्हिडिओ व्हायरल झाल्याने धाराशिव पोलिसांकडे तक्रारी दाखल होण्याची शक्यता आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून, नेटकऱ्यांनी घायवाळच्या गुन्हेगारी नेटवर्कवर आणि राजकीय संरक्षणावर सवाल उपस्थित केले आहेत.